30 दिवसांत केमिस्ट्री MASTER करा!
14 एप्रिल ते 16 मे 2026
• IIT-JEE कॅम्पस, एकविरा चौक •
2 वर्षांची संपूर्ण
JEE | NEET | CET तयारी
Fun + Activity Based Learning. Result-Oriented Teaching.

केमिस्ट्री "मास्टर-ब्लास्टर"
डॉ. बालराजु कर्री
JEE AIR 6 | NIT वारंगळ | आंतरराष्ट्रीय लेखक
10वी तुन 11वीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी.
- आजच नाव नोंदणी करा -
8237 289 300


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


10वी ते 11वीत जाणाऱ्या JEE विद्यार्थ्यांसाठी,
मोफत ब्रिज कोर्स
16 एप्रिल पासून सुरू...
10वी नंतरचा Strong Foundation तयार करा.
11वी + JEE ची सुरुवात करा आत्मविश्वासाने...
वरील ब्रिज कोर्स हा 1 मे 2026 पासून सुरू होणाऱ्या बॅच साठी आहे.
QR कोड स्कॅन करा आणि आपली जागा निश्चित करा.
7501-988-988
shrisandipaniacademy.in
drbalrajukarri.coach

ज्ञानासोबत कौशल्य, चारित्र्य आणि समर्पण...
श्री सांदिपनी अकॅडमी
ISO 9001 : 2015
MORE THAN 10 YEARS OF EXCELLENCE
IIT-JEE | NEET | MHT-CET साठी सर्वाधिक विश्वासार्ह आणि गुणवत्तापुर्ण अकॅडमी
• NEET साठी 5 दिवसांच्या फ्री डेमो क्लासेस. अनुभव घेऊन निर्णय घ्या! •
• 11वी JEE आणि NEET बॅचेस 16 एप्रिल पासून सुरू होत आहेत. •



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १३.०४.२०२६ | अंक नं. ११ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026

बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी

लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999


दिवंगत रविंद्र दगडू कांबळे
(मा.नगरसेवक) स्व. दि.१/६/२०१०

भारतरत्न
डॉ. बाबासाहेब भिमराव आंबेडकर
१३५ व्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
ज्यांनी अंधारात जगणाऱ्या समाजाला ज्ञानाचा दिवा दाखवला,
ज्यांनी अन्यायाच्या साखळ्या तोडून स्वाभिमानाचं जीवन दिलं,
ज्यांनी शब्दांना ताकद दिली आणि माणसाला माणूस म्हणून,
जगायला शिकवलं तेच आमचे प्रेरणास्थान..
भारतरत्न डॉ.बाबासाहेब भिमराव आंबेडकर
महामानवास जयंती निमित्त
कोटी कोटी वंदन


- अभिवादक -
सागरभाऊ भिंगारदिवे फाऊंडेशन । टायगर ग्रुप
दिवंगत नगरसेवक स्व. रविंद्र दगडू कांबळे मित्र मंडळ
समस्त स्वाभिमानी भिमसैनिक, अहिल्यानगर
मा.श्री. सागरभाऊ भिंगारदिवे
(उद्योजक) Mo. 9552497777
मा.श्री. बंटीभाऊ भिंगारदिवे
(जिल्हाध्यक्ष : टायगर ग्रुप, अहिल्यानगर) Mo. 9807982222

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# निर्दयीपणे म्हशीची वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर सोलापूर रोडवर साकत परिसरात एका टेम्पोमध्ये म्हशीला अत्यंत निर्दयपणे बांधून तिची वाहतूक केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत निरज किरण ताठे (रा. गवळी वाडा, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी बबन रामभाऊ बोठे आणि दत्तात्रय कुंडलिक कांडेकर (दोघे रा. वाळकी, ता. नगर) हे एका पांढऱ्या रंगाच्या टेम्पोमधून (क्र. एमएच १६ सीडी ०२९०) एका काळ्या रंगाच्या म्हशीला घेऊन जात होते. यावेळी आरोपींनी म्हशीचे पाय व शरीर अत्यंत घट्टपणे जखडून बांधले होते, ज्यामुळे त्या प्राण्याला कोणतीही हालचाल करता येत नव्हती. इतकेच नव्हे तर त्या मुक्या प्राण्याला पुरेसे अन्न, पाणी आणि निवारा न देता त्याची उपासमार करून त्याला क्रूर वागणूक दिली जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

या कारवाईत पोलिसांनी ३० हजार रुपये किमतीची म्हैस आणि अडीच लाख रुपयांचा टेम्पो असा एकूण २ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस हवालदार वांढेकर हे करीत आहेत.

# अहिल्यानगर शहरात भोंदूगिरी करणाऱ्या अशोक खरातच्या प्रतिकात्मक पुतळ्यास शेणाचे लाडू खाऊ घालून 'जोडे मारले'

## भोंदूगिरीविरोधात संतापाचा उद्रेक; 'सूर्यसाक्षी शेण लाडू' अभियानातून अनोखा निषेध, अंधश्रद्धेविरोधात कडक कारवाईची मागणी

नगर – शहरात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने भविष्य सांगण्याच्या नावाखाली भोंदूगिरी करणाऱ्या अशोक खरात च्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करण्यात आले. हुतात्मा स्मारक येथे पार पडलेल्या या आंदोलनात सूर्यसाक्षी शेण लाडू अभियान राबवत भोंदूगिरीचा निषेध नोंदवण्यात आला. खरातच्या प्रतिकात्मक पुतळ्यास शेणाचे लाडू खाऊ घालून जोडे मारण्यात आले. आंदोलनाची सुरुवात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच छत्रपती चौथे शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी अभिवादन करून करण्यात आली. यावेळी अ‍ॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अ‍ॅड. अमित थोरात, वीर बहादुर प्रजापती, ओम कदम, पोपट शेळके, अशोक भोसले यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.


शहरात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने भविष्य सांगण्याच्या नावाखाली भोंदूगिरी करणाऱ्या अशोक खरात च्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान अशोक खरात याच्या भोंदूगिरीचा तीव्र निषेध करण्यात आला. तसेच त्याच्या संपर्कात असलेल्या मंत्री, आमदार आणि कथित भोंदू समर्थकांवरही टीका करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी राज्यात अंधश्रद्धा पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी व अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

सूर्यसाक्षी शेण लाडू अभियान हे केवळ निषेध आंदोलन नसून समाजातील चुकीच्या समजुतींवर थेट प्रहार करणारा एक सामाजिक प्रयोग असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. शेण लाडू हे प्रतीक वापरून शुद्ध–अशुद्ध या पारंपरिक संकल्पनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

स्वच्छ भारतानंतर आता स्वच्छ मन ही संकल्पना मांडत, समाजातील अंधश्रद्धा, जातीयता, स्त्रीदास्य व मतदारदास्य या अमानवी विचारसरणी बदलण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. आयोजकांच्या मते, ९ ते १८ वर्षे हा मुलांच्या विचारघडणीचा अत्यंत महत्त्वाचा काळ आहे. याच वयात श्रद्धा, मूल्ये आणि सामाजिक दृष्टिकोन तयार होतात. त्यामुळे या वयोगटासाठी विशेष शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबवणे अत्यावश्यक आहे. जात, अंधश्रद्धा आणि भेदभाव हे जन्मजात नसून समाजातून शिकले जातात. त्यामुळे योग्य शिक्षण व जागृतीच्या माध्यमातून त्यामध्ये बदल घडवून आणणे शक्य आहे, असेही स्पष्ट करण्यात आले.

अ‍ॅड. कारभारी गवळी म्हणाले की, आज समाजात विज्ञानाच्या नावाने प्रगती होत असली तरी अंधश्रद्धेचे जाळे अजूनही घट्ट विणले गेले आहे. काही भोंदू लोक लोकांच्या भीतीचा आणि अज्ञानाचा फायदा घेतात. हे थांबवण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर समाजाने जागरूक होणे गरजेचे आहे. 'सूर्यसाक्षी शेण लाडू' हा उपक्रम लोकांच्या मनातील अंधश्रद्धेवर प्रहार करणारा असल्याचे ते म्हणाले.

अशोक सब्बन म्हणाले की, भोंदूगिरी ही केवळ अंधश्रद्धा नसून ती एक प्रकारची सामाजिक फसवणूक आहे. लोकांच्या भावनांशी खेळून त्यांना चुकीच्या मार्गावर नेले जाते. अशा प्रवृत्तीला थारा देणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. समाजाने विज्ञाननिष्ठ विचार स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रकाश थोरात म्हणाले यांनी सांगितले की, अशोक खरातसारख्या भोंदू लोकांना काही पुढाऱ्यांचे अप्रत्यक्ष समर्थन मिळाल्यामुळे त्यांची मजल वाढली आहे. अशा लोकांनी समाजातील महिलांच्या सन्मानालाही धक्का दिला आहे. त्यामुळे भोंदूगिरीला पाठिंबा देणारे राजकीय नेतेही तितकेच जबाबदार आहेत. 'अंधश्रद्धा पोसणाऱ्यांना महाराष्ट्रात स्थान नाही' हा आमचा जनलोक संदेश असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'बीएलओं'कडून नागरिकांना असहकार्य, उडवाउडवीची उत्तरे

नगर – महाराष्ट्रात एस.आय.आर द्वारे मॅपिंग प्रक्रिया सुरु करण्यात आली असून या प्रक्रियेला शासना मार्फत बी एल ओ नेमले आहे. या बी.एल.ओ यांची जबाबदारी आहे कि त्यांना दिलेल्या यादीत असलेल्या प्रत्येक माणसाचे घरी जाऊन त्यांची माहिती घेऊन मॅपिंग करून घेणे. त्यासाठी त्या घरातील कुटुंबांना २००२ साली झालेल्या निवडणुकीतील यादीचा आधार घेण्यात आले आहे. परंतु सामान्य नागरिकांना बहुतांश बी.एल.ओ कोणीही सहकार्य करत नाही. नागरिकांनी आपल्या प्रभागातील बी.एल.ओ ला फोन केल्यास त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. मी तुमचा बी.एल.ओ नाही, मी काम सोडून दिले, मी सुट्टीवर आहे, मी कामात आहे काम झाल्यावर फोन करतो. आणि नंतर फोन येत नाही नागरिकांनी परत फोन लावल्यावर फोन उचलत नाही. माझ्या कार्यालयात उद्या या, तो प्रभाग माझा नाही,तुमचे जिथे नाव आहे त्याचे फोटो मला पाठवा, मी आजारी आहे किंवा माझ्या घरचे आजारी आहे. मला जमणार नाही, सर्वात महत्वाचे बहुतांश बी.एल.ओ.तीन चार दिवस फोन उचलत नाही, आणि जेव्हा उचलतात तेव्हा उडवा उडवीचे उत्तर देतात.

सामान्य नागरिकांना आपले बी.एल.ओ माहित नाही कारण त्यांचे घरी कोणीही बी.एल.ओ. गेलाच नाही. या सर्व बाबीं मुळे नागरिक हैराण झाले आहे. जागरूक नागरिक स्वत आपले काम धंदे सोडून बी.एल.ओ.ला भेटण्यासाठी जिथे सांगेल तिथे जातात आणि तिथे गेल्यावर बी.एल.ओ. तिथे उपलब्ध नसतो किंवा त्यांचे असमाधानकारक उत्तर ऐकून नागरिकांना मानसिक त्रास सहन करावे लागत आहे. २००२ च्या निवडणूक यादीत नाव सापडत नसेल तर त्याला कसे शोधावे किंवा नागरिकांना कसा दिलासा द्यावा यावर बहुतांश बी.एल.ओ यांना स्वताला काही माहित नसल्याचेही पहावयास मिळाले आणि ज्यांना माहित आहे त्यांना शोधण्याचा कंटाळा येत आहे. या सर्व समस्यांच्या निवारण करण्यासाठी एम आय एम चे नगर जिल्हाध्यक्ष डॉ. परवेझ अशरफी यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले असून या प्रश्नात लक्ष घालून योग्य त्या कार्यवाहीच्या सूचना देण्याची मागणी केली आहे.

## अ‍ॅड. जॉन कुसमोडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – गुलमोहररोड, सावेडी, महाराजा हॉटेल मागे येथील रहिवाशी, अहमदनगर बार असोसिएशनचे सदस्य अ‍ॅड. जॉन डेव्हिड कुसमोडे (सर) वय ७६ यांचे १३ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी बुऱ्हाणनगर स्मशानभूमी येथे करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून असा परिवार आहे. निखील कुसमोडे यांचे ते वडील होत.

# देवदर्शनासाठी गेलेल्या तरुणासह नातेवाईकांना चौघांकडून बेदम मारहाण

नगर – नगर तालुक्यातील आगडगाव येथे देवदर्शनासाठी गेलेल्या एका तरुणाला आणि त्याच्या नातेवाईकांना जुन्या वादातून चौघांनी लाकडी काठी व दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत निरज किरण ताठे (वय २४, रा. गवळीवाडा, भिंगार) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी नीरज हा त्यांच्या बहिणीच्या सासू आणि सासऱ्यांसोबत आगडगाव येथील काळभैरवनाथ मंदिरात देवदर्शनासाठी गेले होते. यावेळी त्या ठिकाणी आरोपी तुळशीदास विश्वनाथ बोरुडे, ताराचंद विश्वनाथ बोरुडे, राम अशोक कराळे आणि प्रशांत ताराचंद बोरुडे (सर्व रा. आगडगाव हे आले. 'तुमच्या मुलांवर पहिला गुन्हा दाखल केला आहे, तुमची जिरली नाही का?' असे म्हणत आरोपींनी फिर्यादीच्या नातेवाईकांशी वाद घालण्यास सुरुवात केली. 'तुम्ही खोटा गुन्हा दाखल केला आहे' असे फिर्यादीच्या नातेवाईकांनी म्हणताच आरोपींचा राग अनावर झाला.

या रागातून आरोपींनी सर्वांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच तेथे पडलेल्या लाकडी काठीने आणि दगडाने निरज ताठे यांच्या दोन्ही पायांवर प्रहार करून त्यांना जखमी केले. 'तुमची मुले कशी नोकरी करतात तेच बघतो, त्यांना घरी बसवू' अशी धमकीही यावेळी आरोपींनी दिली. या घटनेनंतर निरज ताठे यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ११५, ३५१ (२) आणि ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार सरोदे करत आहेत.

## सौ.रोहिनी जंबुरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – डावरेगल्ली, अहिल्यानगर येथील सौ. रोहिनी जंबुरे (वय ५६) यांचे ११ एप्रिल रोजी रात्री अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी १२ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथील वीरशैव काटवन खंडोबा येथील लिंगायत स्मशानभूमीत करण्यात आला. त्यांच्या मागे पती, एक मुलगी असा परिवार आहे. अ‍ॅड. नितीन जंबुरे यांचे त्या पत्नी होत.

## यशोदाबाई कट्टेकोला यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – श्रमिकनगर येथील रहिवासी यशोदाबाई मलय्या कट्टेकोला (वय ७९) यांचे १२ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अंबादास व कुमार कट्टेकोला यांच्या त्या मातोश्री होत.

## आत्माराम संगारे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – म्हाळादेवी, ता.अकोले येथील रहिवाशी आत्माराम प्रभाकर संगारे (वय ३५) यांचे १२ एप्रिल रोजी पहाटे अल्पआजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर म्हाळादेवी, ता.अकोले, अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे, आई, वडील, पत्नी, एक भाऊ, भावजयी असा परिवार आहे. म्हादेवीचे उपसरपंच शांताराम संगारे यांचे ते बंधू होत.

## सरुबाई पेसोडे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – सरुबाई ज्ञानदेव पेसोडे (वय ९९) यांचे १२ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी श्रीक्षेत्र देवगड संस्थान परिसरात करण्यात आला आहे. सरूबाई पेसोडे यांच्या पश्चात श्रीक्षेत्र देवगड संस्थान, श्री गुरुदेव दत्त पिठाचे महंत ह भ प भास्करगिरी महाराज व मधुकर पेसोडे अशी २ मुले व कन्या कमलबाई रायपुरे आहेत.

## वसंतलाल डागा यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – येथील वसंतलाल चांदमल डागा (वय ७९) यांचे १३ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर १३ एप्रिल रोजी सायंकाळी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रिअल इस्टेट ब्रोकर प्रमोद डागा यांचे वडील, सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या संचालिका सुवर्णा डागा यांचे सासरे तर अशोकलाल, राजेंद्र, मूलचंद डागा यांचे ते चुलते होत.

# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजार कोसळला

## सेन्सेक्स १६०० हून अधिक अंकांनी तर निफ्टी ४५० हून अधिक अंकांनी घसरला

मुंबई – अमेरिका आणि इराण यांच्यात इस्लामाबाद येथे पार पडलेली चर्चा अयशस्वी झाल्यामुळे १३ एप्रिल रोजी देशांतर्गत बाजारात मोठी घसरण दिसून येत आहे. सोमवारी, आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, सुरुवातीच्या व्यवहारात बीएसई सेन्सेक्स १६०० हून अधिक अंकांनी घसरला, तर प्री–ओपनिंगला ४,२०० हून अधिक अंकांनी खाली आला. निफ्टीही ४५० हून अधिक अंकांनी घसरून २३,६०० च्या पातळीखाली आला.

पश्चिम आशियातील चर्चा अयशस्वी झाल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाल्यामुळे देशांतर्गत बाजारावर त्याचा परिणाम दिसून आला. अमेरिका–इराणमधील वाढता तणाव, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदीचा धोका आणि त्यानंतर तेलाच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलरवर गेल्याने १३ एप्रिल रोजी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली, सेन्सेक्स आणि निफ्टी प्रत्येकी जवळपास २% घसरले.

त्याचवेळी, जागतिक बाजारही कोसळले ज्यामुळे देशांतर्गत बाजारात घसरणीचे संकेत मिळाले. बाजाराच्या सुरुवातीला सेन्सेक्स १६०० हून अधिक अंकांनी घसरून ७५,९३९ वर पोहोचला, तर निफ्टी ४५० हून अधिक अंकांनी घसरून २३,६०० च्या पातळीखाली आला.

मुंबई शेअर बाजारात सूचिबद्ध सर्वच ३० स्टॉक्स लालेलाल रंगले. इंडिगो, एशियन पेंट्स, बजाज फायनान्स, मारुती सुझुकी आणि बजाज फिनसर्व्ह यांना सर्वाधिक फटका बसला. तसेच सर्व क्षेत्रीय निर्देशांकातही घसरण नोंदवली गेली. निफ्टी पीएसयू आणि रिअल्टी तीन टक्क्यांहून अधिक घसरले. निफ्टी ऑटो, बँक, वित्तीय सेवा, मीडिया, ग्राहक टिकाऊ वस्तू आणि तेल व वायू दोन टक्क्यांहून खाली आले.

दुसरीकडे, एनएसई निफ्टीमध्ये कोल इंडिया, ओएनजीसी आणि सन फार्मासारख्या शेअर्समध्ये वाढ झाली तरी, बजाज फायनान्स, एशियन पेंट्स, आयशर मोटर्स, इंटरग्लोब एव्हिएशन आणि श्रीराम फायनान्सच्या शेअर्समध्ये घसरण झाली. सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका, ऊर्जा, तेल व वायू, आणि स्थावर मालमत्ता क्षेत्राचे निर्देशांक सुमारे २% घसरले. निफ्टी मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक सुमारे १.५% खाली आले.

इस्लामाबादमध्ये इराण आणि अमेरिका यांच्यातील चर्चा अयशस्वी झाल्यानंतर अमेरिकन नौदल होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी करणार या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रॅप यांच्या धमकीनंतर पश्चिम आशियातील शस्त्रसंधी भंग होण्याची आणि दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धाची भीती निर्माण झाली ज्यामुळे १३ एप्रिल रोजी आशियाई बाजारात विक्रीचा सपाटा लागला. जपानचा निक्केई आणि दक्षिण कोरियाचा कोस्पी १% हून अधिक खाली आला. तर हाँगकाँगचा हँग सेंग एक टक्क्याहून अधिक घसरला आणि चीनचा शांघाय कंपोझिट ०.२५% हून अधिक घसरला.

# हॉटेलमध्ये जेवायला गेलेल्या तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण

## डोक्यात काचेचा ग्लास फोडला, तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर: हॉटेलमध्ये जेवण करत असताना 'आमच्याकडे रागाने का पाहतो' अशी विचारणा करत तीन तरुणांनी एका मजुराच्या डोक्यावर काचेचा ग्लास मारून त्याला जखमी केल्याची तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना ११ एप्रिल रोजी रात्री घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत स्वप्निल शंकर ठोंबरे (वय २९, रा. गणेश चौक,भुतकरवाडी) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी स्वप्निल हा त्याच्या मित्रासह पटवर्धन चौकातील एका हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेला होता. यावेळी त्यांच्या शेजारील टेबलवर आरोपी अक्षय आडेप, पवन फिरोदिया आणि सारंग पंधाडे (सर्व रा. तोफखाना) हे बसलेले होते. जेवण सुरू असताना 'तू आमच्याकडे रागाने का बघतोस' असे म्हणत आरोपींनी स्वप्निलशी वाद घातला.

या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. यावेळी आरोपी अक्षय आडेप याने टेबलावर असलेला काचेचा ग्लास स्वप्निलच्या डोक्यात जोरात मारला, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. तसेच पवन फिरोदिया आणि सारंग पंधाडे यांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. जखमी स्वप्निलला उपचारासाठी तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात नोंदवलेल्या जबाबावरून कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ११५(२) आणि ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार प्रदीप बडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### संगीताच्या आसमंता मधली एक असीम निराशेची कालची संध्याकाळ...

# आशा भोसले नावाचं वादळ शांत झालं...

निराशेच्या डोहात सोडून गेली आशा.. ब्रह्मदेवाने काही व्यक्तिमत्व निश्चितच तो वेगळ्याच दिलखुष मूडमध्ये, असतांना एकाग्र मन लावून बनवल्याप्रमाणे सर्वगुणसंपन्न बनवलेले असतात.. सगळ्याच गुणांचं दान भरभरून आपल्या ओंजळीने त्याने आपल्या निर्मितीच्या पदरामध्ये ओतलेलं असतं, तसंच हे वर्णनापलीकडचे व्यक्तिमत्त्व म्हणजे आशा भोसले...

एखाद्या विस्तीर्ण पसरलेल्या बागेमध्ये एखाद्या वेलीला जर जाई, जुई, चमेली, मोगरा, गुलाब अशा सगळ्या प्रकारची सुवासाची आणि सौंदर्याची फुलं, त्या एकाच वेलीवर एकाच गुच्छामध्ये लगडली तर काय आश्चर्यकारक बहार येईल? तेच आश्चर्य आशाताईंच्या बाबत घडले असावे.. कदाचित!

वयाच्या पंधराव्या वर्षी १९४८ मध्ये पहिलं गीत गाऊन, नंतर अतिशय विपरीत परिस्थितीमध्ये सर्वांना पुरून उरलेली अशी ही आशा.... तब्बल ७८ वर्ष चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या या स्वच्छ आणि स्वच्छंदी स्वरांच्या स्वरनायिकेनं, स्वयंसिद्ध कर्तुत्व काय असतं? हे सिद्ध केलं.

वैयक्तिक आयुष्यात घरी, दारी, संसारी, दुनियादारी सगळीकडे निराशेचे काळे कुट्ट ढग जोरदार संकटांची बारीश करत असतानाही, त्या निराशेच्या ढगांखाली ही आशा कशी टिकून राहते? नुसती टिकूनच राहत नाही तर तब्बल नऊ वेळेस फिल्मफेअर अवॉर्ड, पद्मविभूषण आणि दादासाहेब फाळके अवॉर्ड, अशा असंख्य पुरस्काराने सन्मानित असलेली कलंदर आशा... ही एकंदर सगळ्यां रसिकांच्या जगण्याचीच 'आशा' होती...



संगीतामध्ये स्वरांना 'ठाव' आणि 'उठाव' दोन्ही असेल तरच ते रसिकांच्या हृदयाला थेट जाऊन भिडतं.. भावगीत, नाट्यगीत, भक्तीगीत, उडत्या चालीचं एखादं रांगडं सादरीकरण, हळुवार प्रेमभावनेची थरथर, प्रेमिकेचा अल्लडपणा या बरोबरच, नुसते बेहोश करणारे बेधुंद हसणे, जीवघेणे उसासे, रंगीन कॅब्रेही... अशा सगळ्या प्रांतामध्ये अनभिषिक्त सम्राज्ञी असलेली आशा... हीच आता जाणकार रसिकांसाठी संगीतामध्ये उरलेली एक आशा होती.. आता मात्र रसिकांच्या संगीत आसमंता मध्ये पसरलेली असेल फक्त निराशा..

अतिशय जिद्दी, कणखर, स्पष्टवक्ती, प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला छेदणारी, कुठल्याही परिस्थितीला सामोरे जाण्याच्या धाडसीपणा,

बदलणाऱ्या काळा बरोबर बेमालूमपणे स्वतःला बदलवून घेणारी एक अदाकारा, शरीराचे वय हे केवळ एक निमित्त मात्र आकडा आहे ,हे सिद्ध करणारी एखाद्या षोडशेलाही लाजवील, अशी पेशकारी आणि हौशीपणा असलेली कुठल्याही प्रकारच्या गीताचे आव्हान स्वीकारून संगीतकाराच्या अपेक्षेला पूर्णतः उतरणारी एक स्वर तपस्विनी, या एकूण एक भूमिकांमध्ये या 'आशा' नावाच्या व्यक्तिमत्त्वाच्या आसपास देखील कोणी फिरू शकेल असे पाऊणशे वर्षात घडले नाही.

वास्तविक इतक्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचा कधी अंत होतच नसतो.. अशा व्यक्तिमत्त्वांच्या समोर तर साक्षात यम देवाचा देखील पराभव होत असतो, कारण तो त्याच्या बरोबर फक्त घेऊन जाऊ शकतो केवळ त्यांचं मृत शरीर... अशा कलाकारांनी केलेलं स्वर सृजन हे या पृथ्वीच्या अंतापर्यंत विश्वाच्या आसमंतामध्ये चिरंजीव राहणार आहे.

सप्तचिरंजीवांच्या संकल्पनेप्रमाणे आठवा चिरंजीव कोण असेल तर तो आहे, असा स्वर जो पृथ्वीला व्यापूनही दशांगुळं उरतोच...

आशाताईंच्या हळूहळू थांबत गेलेल्या स्वरांच्या श्वासातून सुद्धा कदाचित असाच हुंकार आला असेल..

कळ्यांच्या श्वासातून रोज उगवेल मी...
फुलांच्या सुवासातून रोज फुलेंन मी..
या नश्वर देहाची राख जरी झाली,
चंद्रांच्या जखमांतून रोज उगवेल मी..

**– सुहासभाई मुळे**, ९८२३७२२२१२
(ऑल इंडिया रेडिओ, संहिता लेखक, निवेदक, संगीत समीक्षक.)

# उद्योगविश्वाशी संवाद साधणारा 'आयएमएस अनप्लग्ड' पॉडकास्ट लाँच


येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रिसर्च मधील बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांनी "IMS Unplugged' पॉडकास्ट लाँच केले आहे.

नगर - येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रिसर्च (IMSCDR) मधील बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांनी "IMS Unplugged' पॉडकास्ट लाँच केले आहे. या चॅनलवरील पहिल्याच व्हिडिओला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला आहे. यामध्ये उद्योजक आदेश चंगेडिया (चंगेडिया आउटडोरचे संस्थापक) यांची मुलाखत घेण्यात आली. From Zero to Billboard King या विषयावर आधारित या संवादातून त्यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव, संघर्ष आणि यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडली.

विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश उद्योगविश्वातील वास्तव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा आहे. IMS Unplugged' हा बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांचा विद्यार्थी-नेतृत्वाखालील उपक्रम असून,

## बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांचा अभिनव उपक्रम

उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट संवाद साधून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळवून देण्याचा प्रयत्न यामधून केला जात आहे. सदर पॉडकास्टचे रेकॉर्डिंग आय.एम.एस. कॅम्पसमध्ये पार पडले असून, ९ एप्रिल रोजी हा व्हिडिओ यूट्यूबवर प्रकाशित करण्यात आला.

या उपक्रमासाठी संचालक डॉ. एम. बी. मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांचे मार्गदर्शन लाभले असून, बी.बी.ए. विभाग समन्वयक डॉ. हर्षवर्धन भावसार तसेच बी.सी.ए. विभाग समन्वयक डॉ. सय्यद मुदस्सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या पॉडकास्टचे दिग्दर्शन प्रा. सायली तोरणे यांनी केले.

या उपक्रमात गांधी सुयश, बागरेचा कल्याण, गांधी चेतन, गुंडू पियुष, कुलकर्णी ईश्वरी, कासार ऋचा, शेख खुदेजा, जाधव प्रतीक, सोनटक्के प्रेरणा, ढाबळे जयलक्ष्मी, शेख झेबा, शेलके सदभक्ती, आहुजा अमरीत, लोहाडे निर्मल, थोरात युवराज, शेलके चैतन्य, कोतकर शुभम आदी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. या उपक्रमात विजय पाटोळे व संदेश पाटोळे यांनी नॉन-टीचिंग विभागातून सहकार्य केले.

# आर्किटेक्चरच्या (वास्तुकला) २०२६ प्रवेशासाठी 'नाटा' परीक्षा सुरु

नगर - देशभरातील वास्तुकला (Architecture) महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर (NATA) २०२६ परीक्षेची प्रक्रिया सुरु झाली आहे. कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरद्वारे (CoA) आयोजित केली जाणारी ही परीक्षा बी.आर्च (B.Arch) या पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य आहे.

वास्तुकला क्षेत्रातील करिअरसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी वाळूंज येथील 'रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर' (Ramesh Phirodia College of Architecture) हे महाविद्यालय आहे. जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महाविद्यालयातून दर्जेदार आर्किटेक्ट घडत असून, नाटा परीक्षेच्या तयारीसाठीही येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभत आहे.

नाटा २०२६ ची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून याची नोंदणी NATA2026 वेब साईट वर विद्यार्थ्यांनी करावी, NATA परीक्षेची पहिली फेज ४ एप्रिल ते १३ जुन पर्यंतच्या प्रत्येक शुक्रवारी दुपारच्या सत्रात आणिप्रत्येक शनिवारी दोन सत्रात घेतली जाणार आहे. एक विद्यार्थी जास्तीत जास्त दोन वेळा ही परीक्षा देऊ शकतो, आणि परीक्षेची दुसरी फेज ७ व ८ ऑगस्ट रोजी असून जे विद्यार्थी पहिल्या फेज ला बसू शकले नाही त्यांनाच हि परीक्षा एकदाच देता येऊ शकणार आहे परंतु या विद्यार्थाना ॲडमिशन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रिक्त असलेल्या जागांसाठीच प्रवेश घेता येऊ शकेल. NATA परीक्षेच्या अधिक माहितीसाठी https://nata.in या वेबसाईटला भेट द्या.

NATA प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ॲडमिशन सेलशी (Admission Cell) ८६०५०५३०२५/ ९८६०४९५४९४ क्रमांकावर संपर्क साधावा: ईमेल : phirodia@rediffmail.com अधिकृत संकेतस्थळ: www.rpetarchitecture.com

# प्रेरणादायी अक्षरधन

## भक्तिशास्त्र अधिकारी

"मुसाफिर"
वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

भक्ती ही भावावस्था आहे, शास्त्र आहे की दर्शन आहे ? दर्शन हे एक शास्त्र आहे आणि दर्शनशास्त्र हा एक अनुभूतीचा विषय आहे. दर्शनशास्त्रकारांनी सांगितलेली प्रमेये जर अनुभवाच्या कसोटीवर उतरणार नसतील तर ते दर्शनशास्त्र दर्शन या संज्ञेला प्राप्त होऊ शकत नाही. दर्शनाचा अर्थच मुळी साक्षात्कार किंवा अनुभूती असा आहे. जाणीव हा शब्द आपण व्यवहारात नेहमी वापरतो. जाणीव ही लौकिक अर्थाने अस्तित्वात आली तर तो अनुभव असतो आणि जाणीव जेव्हा अलौकिक पातळीवरून आविष्कृत होते तेव्हा ती अनुभूती होते. अलौकिक अनुभूती जेव्हा अलौकिकातून लौकिकाकडे वाटचाल करू लागते तेव्हा सामान्यांच्या जीवनातही दर्शन ही संकल्पना अनुभवता येते.

दर्शन केवळ प्रयोजन सांगून थांबत नाही तर प्रयोजनाच्या प्राप्तीचा साधनमार्गही सांगत असतो असे प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराजांनी म्हटले आहे. दर्शनेही ज्ञानतत्त्वाने अधिष्ठित असतात. ज्ञानाच्या दोन अवस्था आहेत. एक परोक्षज्ञान आणि दुसरी अपरोक्षज्ञान. आपण ग्रंथ, संत तत्त्ववेत्ते यांच्याकडून ऐकतो, श्रवण करतो आणि त्यातून जे ज्ञान मिळते ते परोक्षज्ञान होय पण त्यानंतर जे ऐकले आहे, ज्याचे श्रवण घडले आहे त्याची प्रत्यक्ष अनुभूती घडते ते प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे अपरोक्षजान होय. भक्त, साधन, उपासक हे परोक्षज्ञानाचे रूपांतर अपरोक्षज्ञानात करतात. या अनुभूतीसाठी भक्ती आवश्यक ठरते. आध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने ज्ञानप्राप्तीसाठी आणि अपरोक्षज्ञानासाठी आवरण आणि विक्षेप हे दोन प्रतिबंध आहेत आणि हे प्रतिबंध भक्तिनेच लय पावतात. भक्तिमध्ये सगुण भक्ती आहे. त्यात भगवंताची लीला आहे. त्या लीलेच्या वर्णनात दडलेले प्रेम आहे. भगवंताविषयीची आत्यंतिक ओढ आणि ध्यान आहे. हे ध्यान परिपूर्णतेकडे नेते. धावणारे मन ध्यानाने थांबते. तुकोबाराय म्हणतात,

आता कोठे धावे मन।
तुझे चरण देखलिया

म्हणजे सगुण भक्तिच्या महात्म्यज्ञानाने आचरणाची निवृत्ती होते तर लीला संकीर्तनाने विक्षेपाची निवृत्ती होते. म्हणूनच ज्ञानयोग किंवा अष्टांगयोगातील साधकांपेक्षाही मुक्त भक्त हाच खऱ्या अर्थाने भक्तिशास्त्राचा अधिकारी होतो.

– किशोर गांधी

# महापालिका पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात, माऊली सभागृहात रंगला 'गीत-संगीता'चा जल्लोष; कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव

नगर - महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला सांस्कृतिक महोत्सव माऊली सभागृहात उत्साहात झाला. या कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हिंदी-मराठी गीतांच्या सादरीकरणातून आपल्या कलागुणांची रंगतदार झलक सादर करत उपस्थितांची मने जिंकली. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त गजेंद्र मुक्तेकर, सभापती दिपालीताई बारस्कर, नगरसेवक करण कराळे, मोहित पंजाबी, पुष्कर कुलकर्णी, रोहन सानप, सुशांत जाधव, उपायुक्त मेहर लहारे, शहानवाज तडवी, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शंकर मिसाळ, क्रीडा अधिकारी फिलिप्स आर्दीसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, महानगरपालिका ही कर्मचाऱ्यांचे हित जपणारी संस्था असून प्रशासनाने सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावला आहे. नगरकरांचे प्रश्न सोडवण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, असे त्यांनी आवाहन केले. तसेच धकाधकीच्या जीवनात आनंदी राहण्यासाठी व कलागुणांना वाव देण्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील वर्षी हा सांस्कृतिक महोत्सव महापालिकेच्या सभागृहातच आयोजित करण्यात येईल, असे सांगताना त्यांनी सभागृहाच्या इंटेरियर कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही केली.


महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक महोत्सवाचे दीपप्रज्वलन करुन शुभारंभ करताना महापौर ज्योतीताई गाडे आदी. (छाया : लहू दळवी)

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने महापालिकेच्या माध्यमातून या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी हिंदी व मराठी गीतांच्या माध्यमातून आपल्या संस्कृती व परंपरेचे जतन करण्याचे काम केले, असे त्या म्हणाल्या.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी सांगितले की, पदाधिकारी नगरकरांना जे आश्वासन देतात ते पूर्ण करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावतात. ते शहराचा मुख्य कणा आहेत. पुढील काळात दिवाळी निमित्त महापौर-उपमहापौर महोत्सवाचेही आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळते. महापालिकेने सुरू केलेला हा सांस्कृतिक महोत्सव कौतुकास्पद असून यामुळे कर्मचारी वर्गात उत्साह निर्माण होतो.

कार्यक्रमादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मनाच्या धुंदीत ये ना गं सखे, रामजी की निकली सवारी, अधीर मन झाले, दिल ने दिल को पुकारा, दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, कहो ना प्यार है, यारा तेरी यारी को यांसारख्या मराठी व हिंदी गाण्यांवर बहारदार सादरीकरण करत माऊली सभागृह दणाणून सोडले. प्रेक्षकांनीही या सादरीकरणांचा मनमुराद आनंद घेतला.

विशेष आकर्षण ठरले आयुक्त यशवंत डांगे यांचे 'मनाच्या धुंदीत ये ना गं सखे' या गाण्याचे सादरीकरण. त्यांच्या सुरेल आवाजाने सभागृह मंत्रमुग्ध झाले आणि प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली.




मागास बहुजन कल्याण विभाग, अहिल्यानगर यांच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती सहाय्यक संचालक कार्यालय, मुला-मुलींची वसतिगृहे तसेच आश्रमशाळेत साजरी करण्यात आली.

# इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नगरतर्फे महात्मा ज्योतिराव फुले जयंती उत्साहात साजरी

नगर - इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अहिल्यानगर यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांची १९९ वी जयंती सहाय्यक संचालक कार्यालय, मुला-मुलींची वसतिगृहे तसेच आश्रमशाळेत अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

या वर्षी ११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२७ या कालावधीत महात्मा फुले यांचे २०० वे जयंती वर्ष साजरे करण्यात येत असून, त्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सहाय्यक संचालक विनोद लोंढे व बेबीताई गायकवाड उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सहाय्यक संचालक विनोद लोंढे यांनी जयंतीनिमित्त शुभेच्छा देत महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी कार्याचा आढावा घेतला. तसेच बहुजन कल्याण विभागाच्या ध्येयधोरणांबाबत व भविष्यातील कार्ययोजनेविषयी मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुण्या बेबीताई गायकवाड यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून महात्मा फुले यांचे स्त्रीशिक्षण, सामाजिक न्याय व बहुजन उत्थान याबाबतचे विचार प्रभावीपणे मांडले.

जयंतीनिमित्त मुला-मुलींच्या वसतिगृहात तसेच आश्रमशाळेत निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या विचारांवर आधारित उत्कृष्ट निबंध व भाषणे सादर केली.

स्पर्धेतील विजेत्यांना क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे समग्र वाङ्मय भेट देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचा समारोप निरीक्षक तुकाराम कातकडे यांनी केला. यावेळी सर्व उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या विचारांना आचरणात आणण्याचा तसेच सामाजिक समता व बहुजन कल्याणाच्या कार्याला गती देण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महात्मा फुलेंच्या स्मारकाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे

## शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे



नगर - थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या दांपत्याने देशामध्ये शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. या सगळ्याचा ऐतिहासिक संदर्भ अहिल्यानगर शहराशी जोडला गेलेला आहे. मात्र गेल्या अनेक दशकांपासून शहरांमध्ये फुलेंच भव्य दिव्य स्मारक उभ राहू शकल नाही ही खंत आहे. स्मारक उभारण्याच काम अहिल्यानगर महानगरपालिकेने लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काळे बोलत होते. यावेळी संजय झिंजे, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, रावजी नांगरे, दीपक भोसले, संजय गारुडकर सर, राम वाणी, राम झिने, अलतमश जरीवाला, रोहन शेलार, चंद्रकांत उजागरे, संतोष घरवाढवे, मतीन शेख, उषाताई भगत, शैलाताई लांडे, शंकर आव्हाड, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे, अमोल खाडे, रामभाऊ धोत्रे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

काळे म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील रूढी, परंपरा यांना छेद देत समाजामध्ये बदल रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना मोठ्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये महात्मा फुले यांनी केलेले क्रांतिकारी कामामुळे समाजाची दिशा बदलून गेली. महात्मा ज्योतिबा फुले यांना सावित्रीमाईंची मिळालेली साथ अत्यंत महत्त्वपूर्ण होती. फातिमा शेख यांचा देखील या चळवळीतील सहभाग हा अत्यंत मोलाचा आहे.

### अशोक खरातची भोंदूगिरी संतापजनक

किरण काळे पुढे म्हणाले, शिव, शाहू, आंबेडकर, फुलेंच्या महाराष्ट्रात अशोक खरात सारख्या भोंदूंची भोंदूगिरी आजही समाजाचे भक्षण करते ही अत्यंत संतापजनक बाब आहे. समाजाने, विशेषत: माता-भगिनींनी अशा भोंदू बाबांच्या विळख्याला बळी पडू नये. क्रांतीज्योती सावित्रीमाई, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी, झाशीची राणी यांची प्रेरणा सोबत कायम ठेवली पाहिजे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करणाऱ्या नरेंद्र दाभोळकरांची उणीव या प्रकरणा नंतर महाराष्ट्राला जाणवते आहे. फुले जयंतीच्या निमित्ताने मी आवाहन करतो की, भोंदूगिरीला बळी न पडता शिक्षणाची कास धरून समाजाने पुढे जायला हवे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हीच खरी समाजसेवा

## जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे प्रतिपादन

नगर - जिल्हा परिषद शाळा या सर्वसामान्य व कष्टकरी वर्गाच्या मुलांचे शिक्षणाचे केंद्र आहेत. नोबल फाउंडेशनसारख्या संस्थांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना उंच भरारी घेण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे. पैसा किती खर्च झाला यापेक्षा त्यामागची भावना महत्त्वाची असून अशा सामाजिक कार्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेत नक्कीच वाढ होईल, स्पर्धा परीक्षेमध्ये आजही जिल्हा परिषदेचे विद्यार्थी प्रथम क्रमांकावर आहेत समाजात श्रीमंतांची संख्या खूप आहे परंतु पैसा असूनही देण्याची दानत नाही ज्यांची देण्याची दानत आहे तोच खरा समाजसेवक त्यापैकी नोबल फाउंडेशनचे डॉ. बापू कांडेकर आहेत पैसा किती खर्च केला त्यापेक्षा त्या मागची भावना महत्त्वाची आहे. नगर जिल्ह्यात ३५३२ जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत या ठिकाणी उत्तम पद्धतीने अध्यापनाचे काम केले जाते माजी विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचे आम्ही गावागावात आव्हान केले त्याचा परिणाम चांगला दिसून आला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील गुणोत्तेत वाढ झाली आहे नोबल फाउंडेशन ने जिल्हा परिषद शाळांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करून जो विश्वास दाखवला आहे त्याचा निश्चित फायदा होणार असून गुणवत्ता वाढीवर चांगला परिणाम होईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले.

नोबल मेडिकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटरच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ निमित्त जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य व डिजिटल बोर्डचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते तसेच राज्याचे आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष पोपट पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.



एशियन नोबल हॉस्पिटलमध्ये नोबल मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटरच्या वतीने ग्रामीण भागातील शाळांना डिजिटल शैक्षणिक साहित्याचे वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, सरपंच पोपट पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. बापू कांडेकर, डॉ. संगीता कांडेकर इतर (छाया : समीर मन्यार)

## नोबल मेडिकल फाउंडेशनचा हातभार; शाळांना डिजिटल साहित्याचे वाटप

कार्यक्रमात राज्याचे आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष पोपट पवार यांनी सांगितले की, गेल्या दोन दशकांपासून नोबल हॉस्पिटल व फाउंडेशन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत आहे. 'चला गावाकडे चला' ही संकल्पना प्रत्यक्षात आणत त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण संस्कार जपण्याचे काम केले आहे. नोबल फाउंडेशन च्या माध्यमातून चाललेल्या या कार्याचा आदर्श इतरही सामाजिक संस्थांनी घ्यावा असे ते म्हणाले.

फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. बापूसाहेब कांडेकर यांनी आपल्या मनोगतातून ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ अधोरेखित केली. ते म्हणाले की, नोबल फाउंडेशनची स्थापना २००४ साली झाली असून गेल्या २२ वर्षांपासून आम्ही सामाजिक कार्य सातत्याने करत आहोत. आमचे संपूर्ण शिक्षण खेड्यात झाले आहे. त्या काळात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. कठीण परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून आम्ही शहरात आलो, मात्र ग्रामीण भागातील संघर्ष कधी विसरलो नाही. शिक्षण घेताना आम्हाला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आजच्या पिढीला त्या अडचणींना सामोरे जावे लागू नये, हा आमचा उद्देश आहे. म्हणूनच नोबल फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने आणि प्रोत्साहन देण्याचे काम आम्ही करत आहोत. शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ व्हावी आणि विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, यासाठी डिजिटल बोर्डचे वितरण करण्यात आले आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले आहेत. कोरोना काळात गरजूंना मदत, तसेच अनाम प्रेम संस्था, राष्ट्रीय अंधत्व निवारण संस्था यांसारख्या संघटनांना मदत देण्यात आली आहे. एकूण सुमारे २ कोटी ३६ लाख रुपयांची मदत विविध उपक्रमांद्वारे करण्यात आली आहे. आज जिल्ह्यातील १३ शाळांना डिजिटल बोर्ड देताना आम्हाला समाधान वाटत आहे. हे काम समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास डॉ. संगीता कांडेकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, रमेश रोहोकले, डॉ. दिलीप पवार, डॉ. नानासाहेब अकोलकर, डॉ. सुंदर गोरे, डॉ. विजय पाटील, डॉ. पांडुरंग डौले, उपसभापती रामदास भोर, डॉ. सुनील गंधे, विजय निकम, राहुल हिरे अजित माने, अभय गायकवाड आदींसह शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. विजय निकम, राहुल हिरे, प्रशासकीय अधिकारी विश्वजीत मोरे यांचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले. सूत्रसंचालन डॉ. संतोष मोरे यांनी केले. डॉ. नानासाहेब अकोलकर यांनी आभार मानले.



भिंगार येथील स्वा. सैनिक जानकी कवडे प्रशाला येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस स्नेहबंध चे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी कापरे, मुख्या. नंदकुमार लोणकर, निशांत पानसरे आदी.

# चित्रकला स्पर्धेतून फुले विचारांचा जागर

### स्नेहबंधचे डॉ. उद्धव शिंदे यांचे प्रतिपादन

नगर – महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण, समता आणि समाजसुधारणा यासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेत समाजासाठी कार्य करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी यावेळी केले.

स्नेहबंध तर्फे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून भिंगार येथील स्वा. सैनिक जानकी कवडे प्रशाला येथे महात्मा फुले यांच्या प्रतिमेस डॉ. उद्धव शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यानिमित्त माध्यमिक गटातील (इयत्ता ६ वी व ७ वी) विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

यावेळी शाळेचे संस्थापक डॉ. रविंद्र कवडे, संचालिका सौ. राज कवडे, विस्तार अधिकारी कापरे, मुख्याध्यापक नंदकुमार लोणकर, निशांत पानसरे तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सिराज खान व आभार दीपक पंडित यांनी केले.

# भवानी मराठा महिला ग्रुपतर्फे स्वस्तिक हॉस्पिटलमध्ये निरोगी आरोग्यासाठी तणावमुक्त जीवनशैलीचा कानमंत्र

### आरोग्य सेमिनार उत्साहात, स्त्री आरोग्य, कॅन्सर प्रतिबंधावर डॉक्टर कल्याणी चौधरी यांचे मार्गदर्शन




नगर – शहरातील स्वस्तिक हॉस्पिटलमध्ये भवानी मराठा महिला ग्रुपच्या वतीने महिला आरोग्य सेमिनाराचे आयोजन करण्यात आले होते. या सेमिनारला महिलांचा प्रतिसाद लाभला. यामध्ये महिलांना निरोगी आरोग्यासाठी तणावमुक्त जीवनशैलीचा कानमंत्र देण्यात आला.

यामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. कल्याणी चौधरी उपस्थित होत्या. त्यांनी स्त्री आरोग्य, महिला प्रजनन आरोग्य तसेच कॅन्सर प्रतिबंध या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासण्या करून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः स्तन कॅन्सर व गर्भाशयाच्या कॅन्सरच्या लक्षणांविषयी जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी संतुलित आहार, नियमित व्यायाम, मानसिक आरोग्याची काळजी तसेच तणावमुक्त जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी महिलांनी स्वतःसाठी वेळ देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

सेमिनारदरम्यान उपस्थित महिलांनी विविध आरोग्यविषयक प्रश्न उपस्थित केले. डॉ. चौधरी यांनी सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत उपस्थितांच्या शंकांचे सम ाधान केले. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. महिलांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन भवानी मराठा महिला ग्रुपच्या सदस्यांनी केले होते. यावेळी भवानी मराठा महिला ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट, प्रमुख अतिथी डॉ. कल्याणी चौधरी पाटील, तसेच कमिटी मेंबर्स प्रिया दांगट, भारती भगत, वैशाली गुंड, सोनाली नरवडे, निलिमा म्हस्के, प्रियांका म्हस्के, सुजाता पायमोडे, अमृता वाकळे आदींसह महिला उपस्थित होत्या.

# नागरदेवळे येथे ज्येष्ठांची नेत्र तपासणी; ५७ रुग्णांवर होणार मोफत शस्त्रक्रिया

### महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचा उपक्रम



फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सप्ताहानिमित्त नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात पार पडले.

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव सप्ताहानिमित्त नागरदेवळे येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नेत्रदान व अवयवदानाची जागृती करुन ज्येष्ठांची विविध आरोग्य तपासणी देखील करण्यात आली.

महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी फिनिक्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, कामगार तलाठी आदिनाथ निकम, धनराज गांधी, डॉ. विशाल घंगाळे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड म्हणाले की, नेत्रदान व अवयवदान चळवळ गतीमान होण्यासाठी फिनिक्सचे योगदान सुरु आहे. महापुरुषांनी तत्कालीन सामाजिक प्रश्न व वंचित घटकांसाठी कार्य केले. त्यांचा आदर्श ठेऊन काळाची गरज बनलेल्या आरोग्य प्रश्नावर फिनिक्सचे कार्य दिशादर्शक असून, या शिबिराच्या माध्यमातून गावाचे नाव देश पातळीवर पोहचले असल्याचे त्यांनी सांगितले.

कामगार तलाठी आदिनाथ निकम म्हणाले की, फिनिक्सच्या माध्यमातून अनेक दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळाली आहे. अंधकारमय जीवन बनलेल्या सर्वसामान्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य फिनिक्स फाऊंडेशन करत असल्याचे त्यांनी सांगितले.

जालिंदर बोरुडे म्हणाले की, फिनिक्स फाऊंडेशनने अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आनले असून, एका व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होतो. डोळे कृत्रिमरित्या तयार होत नसून, मरणोत्तर नेत्रदान झाल्यानेच अंधाचे जीवन प्रकाशमान होणार असल्याचे सांगून त्यांनी महापुरुषांच्या विचाराने फिनिक्सच्या माध्यमातून कार्य सुरु असल्याचे सांगितले.

नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमध्ये ४०९ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. ५७ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटल मध्ये मोतीबिंदू, काचबिंदूची मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

यावेळी शिबिरातील गरजूंना अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांचे रक्तदाब, मधुमेह आणि इतर तपासण्या करण्यात आल्या. शिबिर यशस्वी करण्यासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, राजेंद्र बोरुडे, रवी बालटे, ओम बोरुडे यांच्यासह बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार, विशाल भिंगारदिवे, फिनिक्सचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.



चित्रकला स्पर्धेत यशस्वी झालेले सेंट विवेकानंद स्कूलचे विद्यार्थी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासमवेत

# पोलीस प्रशासन आयोजित चित्रकला स्पर्धेत सेंट विवेकानंद स्कूलच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

नगर – आजचे विद्यार्थी आणि भविष्यातील भारताचे सुजान नागरीक असणाऱ्या विदयार्थ्यांना आजच्या सामाजिक समस्या व त्यावरील उपाय याबाबत जागरुकता निर्माण व्हावी. याकरीता जिल्हा पोलीस निर्भया पथक, अहिल्यानगर शहर उपविभाग जागतिक महिला दिना निमित्त चित्रकला व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या उपस्थितीत झाला.

या स्पर्धेमध्ये सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी माध्यमिक विभागाच्या प्राचार्य गीता तांबे, तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली घवघवीत यश संपादन केले.

गट क्र.१ उत्तेजनार्थ – अंगद प्रभाकर भावले, मायरा रोहित वैरागर., गट क्र.२ उत्तेजनार्थ – पूजा योगेश ताटी, प्रणिल अमोल ठिगळे., गट क्रं.३ प्रथम क्रमांक – अपूर्वा सागर नांदुरकर

या विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी मनीष लांडे, सौ.अनामिका म्हस्के यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान तसेच प्राचार्या गीता तांबे व मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फॉर्मकॉलॉजी परीक्षेत डॉ. सौ. रेशमा रिझवान शेख प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



नगर – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक तर्फे घेण्यात आलेल्या हिवाळी २०२५ च्या सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फॉर्मकॉलॉजी (सि. सि. एम. पी.) या परिक्षेचा निकाल नुकताच लागला असून या परीक्षेत शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल श्रीरामपूर च्या फॉरेन्सिक मेडिसिन व टॉक्सीकोलॉजी विभागाच्या गेस्ट प्रोफेसर व गोविंदपुरा येथील इरा क्लिनिकच्या डॉ. सौ. रेशमा रिजवान अहमद शेख या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.

त्या गेल्या २० वर्षा पासून मुकुंदनगर, दर्गादायरा, गोविंदपुरा, फकीरवाडा भागात वैद्यकीय सेवा देत आहेत त्या स्त्रियांचे व लहान मुलांच्या आजारांचे उपचार करतात. त्या सि. सि. एम. पी. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या या भागातील एकमेव व पहिल्या महिला डॉक्टर आहेत. त्यांनी त्यांचे वैद्यकीय शिक्षण सुद्धा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथून घेतले आहे. त्यांनी एक वर्ष कालावधीचा सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फॉर्मकॉलॉजी कोर्स अहिल्यानगर येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फॉन्डेशनच्या मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल विळद घाट, अहिल्यानगर येथे पूर्ण केला.

सदर सि. सि. एम. पी. कोर्स महाराष्ट्र राज्य सरकारने खास ॲलोपॅथी शास्त्राची प्रॅक्टिस करण्यासाठी सुरु केलेला आहे व तो कोर्स पूर्ण करणाऱ्या डॉक्टर चा महाराष्ट्र मेडिकल कॉन्सील च्या यादी मध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

# सर्व आजारांवर होमिओपॅथिक औषध चिकित्सा उपयुक्त शास्त्र आहे

### पोपटराव पवार यांचे प्रतिपादन



डॉ. सोमिनाथ गोपाळघरे यांच्या स्वदर्शी होमिओपॅथिक क्लिनिक व त्वचाविकार उपचार केंद्र येथे 'जागतिक होमिओपॅथी दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महापौर सौ. ज्योती गाडे व पद्मश्री पोपटराव पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

नगर – 'सर्व साधारण सर्दी–खोकला पासून कॅन्सर पर्यंत होमिओपॅथिक चिकित्सा ही अत्यंत उपयुक्त शास्त्र आहे. या शास्त्राचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घेतला पाहिजे.' असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

येथील डॉ. सोमिनाथ गोपाळघरे यांच्या स्वदर्शी होमिओपॅथिक क्लिनिक व त्वचाविकार उपचार केंद्र येथे होमिओपॅथीचे जनक डॉ. सम्युअल हॅनेमन यांच्या २७१व्या जयंतीनिमित्त 'जागतिक होमिओपॅथी दिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी महापौर सौ. ज्योती गाडे व पद्मश्री पोपटराव पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी डायबेटीस तज्ज्ञ डॉ. पियुष पाटील त्यांनी लोकांमध्ये झपाट्याने वाढत असलेला लठ्ठपणा ही चिंतेची बाब असल्याचे सांगितले. अतिलठ्ठपणाचे दुष्परिणाम व त्यामुळे होणाऱ्या आजारांबद्दल माहिती देऊन त्याची कशी काळजी घ्यावी व त्यावर कसे मात करावे हे सांगितले.

याप्रसंगी 'व्हायटल होमिओपॅथिक फोरम'च्यावतीने अहिल्यानगर महानगरपालिकेत कायमस्वरूपी होमिओपॅथिक डॉक्टरांची नेमणूक करण्याबाबत महापौर सौ. ज्योती गाडे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ होमिओपॅथिक डॉक्टरांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे सीनेट सदस्य डॉ. अजित फुंदे, डॉ. सुभाष मेहेर, डॉ. प्रशांत गंगवाल, डॉ. अभय मुथा व डॉ. सुनिता व्यवहारे आदी उपस्थित होते. तसेच शहर व जिल्ह्यातील १०० हून अधिक डॉक्टर्स व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वरा गोपाळघरे व डॉ. अपेक्षा सुर्यवंशी यांनी केले. डॉ. सोमिनाथ गोपाळघरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# पारनेर येथील कान्हूर पठार पतसंस्थेस ११ कोटी ६२ लाख रुपयांचा ढोबळ नफा

नगर – कान्हूरपठार (ता. पारनेर) येथे मुख्य कार्यालय असणाऱ्या कान्हूर पठार पतसंस्थेस आर्थिक वर्षात संस्थेस ११,६२,००,०००.०० रूपयांचा ढोबळ नफा झाला. सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा ३,९०,००,०००.०० रूपयांचा झाल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा सुशिला ठुबे, कार्यकारी संचालिका नमिता ठुबे यांनी दिली.

यावेळी उपाध्यक्ष पी.के. ठुबे, संचालक भोमा ठुबे, राजेंद्र रोकडे, भगवान वाळुंज, सुभाश नवले, राजेंद्र व्यवहारे, सुहास शेळके, भास्कर ठुबे, मधुकर साळवे, संपत खरमाळे, गवराम गाडगे, पो.मा. झावरे, दादाभाऊ नवले, मंगेश गागरे आदी उपस्थित होते.

उपाध्यक्ष ठुबे म्हणाले, पतसंस्थेचे स्व. दिलिपराव ठुबे यांनी सुरु केलेली परंपरा कायम ठेवत संचालक मंडळाने ३१ मार्च रोजी आर्थिक पत्रके जाहीर केले. संस्थेची वार्षिक उलाढाल रु.२,०००.०० कोटींची झाली आहे. खेळते भागभांडवल ८७७ कोटी रुपयांचे आहे. संस्थेच्या १३ शाखांच्या इमारती स्वमालकीच्या आहेत. सदर ठिकाणी लॉकर सुविधा उपलब्ध आहे. सुरक्षीततेला अधिक महत्व देत संस्थेने स्वतः चे डाटा सेंटर सुरु केले. लवकरच युपीआय कोडद्वारे खात्यात पैसे ही सुविधाही सुरु करणार आहोत.

कान्हूर पठार पतसंस्थेने आर्थिक शिस्तीमुळे ग्राहकांचा विश्वास संपादन केला. वाढत्या व्यवहारांसोबत संस्थेने कोअर बँकिंगद्वारे जलद सेवा उपलब्ध केल्या. आरटीजीएस, एसएमएस, एटीएम व्यवहार, बीजबिल भरणा, अशा सुविधा सर्व शाखांत सुरु केल्या. उच्चशिक्षित, विश्वास पात्र, कर्तव्य दक्ष, उत्तम व तत्पर कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेमुळे व संस्थेचे सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्जदार व जामीनदार यांच्या मुळे संस्था राज्य पातळीवर नावारुपाला आली आहे, संस्थेला सातत्याने ऑडीट वर्ग अ मिळत आहे. संस्था दिवसेंदिवस अधिकाधिका प्रगती करत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेले डेटा सेंटर सुरु करुन संस्थेचे कामकाज अधिक गतिमान केले असुन संचालक मंडळाने कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने पगार वाढ, इन्क्रीमेंट, विमा, बोनस बाबत अनेक चांगले निर्णय घेतले असल्याचेही कार्यकारी संचालिका नमिता ठुबे यांनी सांगितले.

# बहिणींच्या हक्कासाठी 'जनलोक अदालत'चा पुढाकार, न्यायासोबत नातेसंबंध जपणारी लोकाभिमुख संकल्पना

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ऐतिहासिक उपक्रम

नगर – कुटुंबव्यवस्थेमध्ये वाढत चाललेल्या मालमत्ता व वारसा हक्काच्या वादांच्या पार्श्वभूमीवर, बहिणींना त्यांचा न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी आणि कुटुंबातील नातेसंबंध जपण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनने जनलोक अदालत या अभिनव उपक्रमाची घोषणा केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी, १४ एप्रिल रोजी या उपक्रमाची औपचारिक सुरुवात होणार असून, ही लोकाभिमुख न्यायप्रणाली समाजात सकारात्मक परिवर्तन घडवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

आजच्या आधुनिक युगातही मालमत्ता वाटपावरून भाऊ–बहिणी, तसेच पालक–संतती यांच्यात वाद निर्माण होत आहेत. हे वाद केवळ कायदेशीर मर्यादेत राहात नाहीत, तर भावनिक आणि सामाजिक तणावाला कारणीभूत ठरतात. विशेषतः महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांपासून वंचित राहावे लागते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.



भारतीय कायद्यानुसार हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) कायदा, २००५ अंतर्गत मुलींना जन्मतःच समान वारसाचा हक्क देण्यात आला आहे. विवाहानंतरही हा हक्क अबाधित राहतो. त्यामुळे बहिणीचा हिस्सा हा कोणताही दान किंवा कृपा नसून तिचा कायदेशीर अधिकार आहे. मात्र, प्रत्यक्ष व्यवहारात अनेक ठिकाणी हा हक्क नाकारला जात असल्याचे दिसून येते. यामागे मुलगी परकी झाली, लग्नात दिले आहे अशा कालबाह्य आणि अन्यायकारक समजुती कारणीभूत ठरत आहेत.

याच पार्श्वभूमीवर जनलोक अदालत ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेत वेळ, पैसा आणि मानसिक तणाव मोठ्या प्रमाणावर असतो, तसेच निकालानंतर नातेसंबंध तुटण्याची शक्यता वाढते. याउलट, जनलोक अदालत ही संवाद, समन्वय आणि सामंजस्यावर आधारित प्रणाली आहे. येथे संबंधित पक्ष एकत्र येऊन कायद्याच्या मार्गदर्शनाखाली परस्पर सहमतीने तोडगा काढतात.

ही संकल्पना केवळ न्याय मिळवण्याचा पर्याय नसून सामाजिक आणि मानसिक परिवर्तनाची चळवळ म्हणून पुढे येत आहे. जागरूकता, तर्कसंगत विचार आणि समतेच्या मूल्यांवर आधारित ही प्रणाली कुटुंबातील विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यास मदत करेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने सुरू होणाऱ्या या उपक्रमामुळे सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांना बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तज्ज्ञांच्या मते, ही प्रणाली व्यापक प्रमाणावर राबवली गेल्यास लाखो महिलांना त्यांचा हक्क जलदगतीने मिळू शकतो. तसेच न्यायालयांवरील ताण कमी होऊन कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ होतील, असे पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले.

या मोहिमेत अशोक सब्बन, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते सक्रिय सहभाग घेत आहेत.

# घोसपुरी येथे १७ एप्रिल रोजी अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ज्येष्ठ-वयोवृद्ध व्यक्तींचा सत्कार

नगर – ज्येष्ठ नागरिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी घोसपुरी (ता.नगर) येथे १७ एप्रिल रोजी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. निस्वार्थ निरपेक्ष कीर्तन प्रवचन समाज प्रबोधनकार ह.भ.प. राजाभाऊ झरेकर यांच्या पुढाकारातून हा सोहळा होत आहे.

घोसपुरी गावातील खामदरा रस्त्यावरील झरेकर वस्ती येथे १७ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता हा सोहळा होणार आहे.

निस्वार्थ निरपेक्ष सेवा करणारे ह. भ. प. राजाभाऊ झरेकर महाराज संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या कार्यासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्या मातोश्रीच्या शेऊबाई झरेकर यांच्या ७५ अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त गावातील सर्व ७० वर्षापुढील ज्येष्ठ – वयोवृद्ध व्यक्तींचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे.

ह भ प निजामभाई शेख आणि सहकाऱ्यांचा अद्वैत तत्वज्ञानावरील भेदिकाचा कार्यक्रम सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होणार आहे. त्यानंतर गावातील सर्व ज्येष्ठांचा सत्कार सोहळ होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

# अर्थजगत

पश्चिम आशियातील युद्धामुळे भारतीय गुंतवणूकदारांचे अवघ्या दोन आठवड्यांत २० लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये १० टक्क्यांहून अधिक घसरण झाल्यामुळे अनेक गुंतवणूकदारांनी घाबरून आपले शेअर्स विकले किंवा एसआयपी बंद केल्या. मात्र, असे संकट येण्यापूर्वी, संकटाच्या काळात आणि संकट संपल्यानंतर काय करावे, याचे भान असल्यास तुमची बचत सुरक्षित राहू शकते. गुंतवणूकतज्ज्ञ मोतीलाल ओसवाल यांनी यासंदर्भात दिलेली माहिती उपयुक्त ठरणारी आहे.

## गुंतवणूक सुरक्षित ठेवण्यासाठी आणि संपत्ती निर्मितीसाठी

**गुंतवणुकीचे विविधीकरण करा :** तुमचे सर्व पैसे एकाच ठिकाणी गुंतवणे धोक्याचे असते. ज्याप्रमाणे आपण दागिने विभागून ठेवतो, त्याचप्रमाणे गुंतवणूकही विविध पर्यायांमध्ये विभागली पाहिजे. एखाद्या गुंतवणूकदाराकडे १० लाख रुपये असतील, तर त्यातील ५ ते ६ लाख रुपये शेअर्स किंवा इक्विटी फंडात, ३ ते ४ लाख रुपये एफडी किंवा पीपीएफमध्ये आणि किमान १ लाख रुपये सोन्यात असावेत. संकटाच्या काळात सोन्याचे भाव वाढतात आणि एफडी सुरक्षितता देते, तर शेअर्समधील गुंतवणूक दीर्घकाळात मोठी वाढ मिळवून देते.

संकट आल्यावर सोने खरेदी करण्यापेक्षा, आधीच आपल्या एकूण बचतीपैकी १० ते १५ टक्के रक्कम सोन्यात गुंतवून ठेवावी. सॉव्हेरन गोल्ड बॉंड हा सर्वोत्तम पर्याय आहे. यात वार्षिक २.५ टक्के व्याज मिळते आणि मुदतपूर्तीनंतर मिळणारा नफा करमुक्त असतो. याशिवाय 'गोल्ड ईटीएफ' हा देखील एक चांगला आणि पारदर्शक पर्याय आहे.

**● संकट काळात पोर्टफोलिओचे पुनर्संतुलन :** जागतिक संकटाच्या वेळी विमानसेवा, पेंट आणि ऑटो कंपन्यांचे शेअर्स



■ अर्थसल्ला

अधिक पडतात. अशा वेळी सर्व शेअर्स न विकता रिबॅलन्सिंग करणे गरजेचे आहे. म्हणजेच, जास्त जोखीम असलेल्या स्मॉल-कॅप फंडातून पैसे काढून निफ्टी ५० सारख्या लार्ज-कॅप इंडेक्स फंडात किंवा फार्मा आणि एफएमसीजी क्षेत्रातील कंपन्यांमध्ये वळवावेत.


कारगिल युद्ध किंवा २०२० ची महामारी यानंतर बाजार केवळ सावरलाच नाही, तर त्याने दुप्पट परतावा दिला. संकटाच्या काळात बाजार कोसळला की एकदम सर्व पैसे न गुंतवता 'स्टॅगर्ड एंट्री' पद्धतीचा वापर करावा. म्हणजेच, तुमच्याकडील रकमेचे ४-५ भाग करून दर आठवड्याला थोडी थोडी गुंतवणूक करावी. यामुळे बाजार आणखी पडला तरी तुमची सरासरी किंमत कमी राहते.

**●सुरक्षिततेसाठी सवयी**

कोणत्याही संकटात पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी काही सवयी अंगीकारणे गरजेचे आहे. प्रथम ६ महिन्यांचा आपत्कालीन निधी तयार करा आणि तो लिक्विड फंडात ठेवा. सोन्यात नेहमी १० ते १५ टक्के गुंतवणूक कायम ठेवा. संकटाच्या वेळी एसआयपी बंद न करण्याची जिद्द बाळगा आणि वर्षातून एकदा आपल्या पोर्टफोलिओची तपासणी करा. सुरक्षिततेसाठी पीपीएफमध्ये दरवर्षी गुंतवणूक करा, कारण ते करमुक्त आणि सरकारी हमी असलेले साधन आहे. तसेच, आपली एसआयपी दरवर्षी १० टक्क्यांनी, ज्यामुळे तुमची संपत्ती वेगाने वाढेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मोठ्या संकटाच्या काळात स्वतः निर्णय घेण्याऐवजी सेबी-नोंदणीकृत आर्थिक सल्लागाराची मदत घ्या. जागतिक संकटे येत-जात राहतील, पण संयम आणि योग्य पूर्वतयारी असणारा गुंतवणूकदारच यातून यशस्वीपणे बाहेर पडतो. ◆◆◆

### आपत्कालीन निधी उभारा

गुंतवणूक सुरू करण्यापूर्वी सर्वात महत्त्वाचे पाऊल म्हणजे आपत्कालीन निधी तयार करणे. हा निधी म्हणजे कठीण काळासाठी राखून ठेवलेली रोकड होय. हा निधी नसेल आणि अचानक संकट आले, तर तुमचे शेअर्स अत्यंत कमी किमतीत विकावे लागतात.यामुळे तुमचे कायमस्वरूपी नुकसान होते. तुमच्या सहा महिन्यांच्या नियमित खर्चा इतकी रक्कम बचत खात्यात किंवा लिक्विड म्युच्युअल फंडात असणे आवश्यक आहे. हा निधी शेअर्स किंवा सोन्यात न ठेवता, बचत खाते किंवा मुदत ठेवीत ठेवावा, जेणेकरून गरज पडल्यास तो एका दिवसात उपलब्ध होईल. अशा संकट काळात एसआयपी कधीही बंद करू नका



**अनेकदा आपल्याला वाटते की आपल्या परवानगीशिवाय बँक खात्यातील पैशांना कोणीही हात लावू शकत नाही. मात्र, काही विशिष्ट परिस्थितींमध्ये बँक तुमच्या खात्यातून पैसे कापून घेऊ शकते. 'मनीकंट्रोल'ने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, हे व्यवहार नेमके कोणत्या नियमांतर्गत होतात, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.**

## बँक तुमच्या खात्यातून परस्पर पैसे कापून घेऊ शकते का?

**● बँक कोणत्या परिस्थितीत पैसे कापून घेऊ शकते?**

**१. तुमची पूर्वसंमती असल्यास :** जर तुम्ही गृहकर्जाचा हप्ता, म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक विम्याचा हप्ता किंवा इतर कोणत्याही सबस्क्रिप्शनसाठी ऑटो-डेबिट किंवा

■ जाणून घ्या

स्टॅंडिंग इन्स्ट्रक्शन सेट केले असतील, तर बँक प्रत्येक वेळी तुमची परवानगी मागत नाही. तुम्ही आधीच दिलेल्या संमतीनुसार हे पैसे ठराविक तारखेला कापले जातात.

**२. बँकेचे शुल्क आणि सेवा कर :** खाते उघडताना आपण बँकेच्या अटी व शर्ती मान्य केलेल्या असतात. त्यानुसार खाते देखभाल शुल्क (अलर्लेपीं चरळपींशपरपलश ऋशश), एटीएम शुल्क, एसएमएस अलर्ट फी किंवा खात्यात किमान शिल्लक (चळपळ्ािा इरश्रररपलश) न राखल्याबद्दलचा दंड बँक थेट खात्यातून वळती करू शकते.

**३. कर्ज वसुली आणि कायदेशीर आदेश :** जर तुमचे एखादे कर्ज थकीत असेल, तर बँक 'राईट ऑफ सेट-ऑफ' या अधिकारानुसार तुमच्या दुसऱ्या खात्यातील शिल्लक रकमेतून थकीत वसुली करू शकते. याशिवाय, प्राप्तिकर विभागाची नोटीस किंवा न्यायालयाच्या आदेशानुसारही खात्यातील रक्कम गोठवली किंवा कापली जाऊ शकते.

**● पैसे कापले जाणे कधी चुकीचे ठरू शकते?**

जर झालेला व्यवहार तुम्ही मंजूर केला नसेल, तो कोणत्याही शुल्काशी संबंधित नसेल किंवा 'डबल चार्ज' झाला असेल, तर तो तांत्रिक बिघाड किंवा फसवणुकीचा प्रकार असू शकतो. अशा वेळी त्वरित बँकेशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

**● अनधिकृत कपात झाल्यास काय करावे?**

**● व्यवहाराची तपासणी:** सर्वात आधी तुमच्या बँक स्टेटमेंटची तपासणी करा आणि पैसे नेमके कुठे वर्ग झाले आहेत ते पहा.

**● बँकेला कळवा:** कपातीचे कारण समजले नाही तर त्वरित बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राला फोन करा किंवा शाखेत जाऊन लेखी तक्रार नोंदवा.

**● अलर्ट सुरू ठेवा:** तुमच्या मोबाईलवर एसएमएस आणि ईमेल अलर्ट नेहमी सुरू ठेवा, जेणेकरून खात्यातून एक रुपया जरी कापला गेला तरी तुम्हाला त्याची तत्काळ माहिती मिळेल. ◆◆◆

**● 'राईट ऑफ सेट-ऑफ' म्हणजे काय? :** हा बँकेचा एक कायदेशीर अधिकार आहे. जर एखाद्या ग्राहकाने बँकेचे कर्ज वेळेवर भरले नाही, तर बँक त्या ग्राहकाच्या इतर बचत किंवा चालू खात्यात जमा असलेली रक्कम कर्जाच्या वसुलीसाठी वापरू शकते. थोडक्यात सांगायचे तर, बँक नियमांच्या अधीन राहूनच पैसे कापते. मात्र, सतर्क राहण्यासाठी वेळोवेळी आपले बँक व्यवहार तपासणे आणि संशयास्पद व्यवहार दिसल्यास त्वरित दाद मागणे हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

## ज्येष्ठ नागरिकांना दिलासा फॉर्म १२१ चा



केंद्र सरकारने १ एप्रिल २०२६ पासून लागू केलेल्या नवीन आयकर कायदा, २०२५ अंतर्गत कर प्रणालीमध्ये अत्यंत क्रांतीकारक बदल केले आहेत. या नव्या नियमावलीमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी 'टीडीएस' म्हणजेच 'स्त्रोत कर कपात' वाचवण्यासाठी 'फॉर्म १२१' हा नवा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

● आतापर्यंत ज्येष्ठ नागरिकांना त्यांचे उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी असल्याचे सिद्ध करण्यासाठी 'फॉर्म १५एच' भरावा लागत असे, तर इतर नागरिकांसाठी 'फॉर्म १५जी' चा वापर केला जात होता. मात्र, आर्थिक वर्ष २०२६-२७ पासून हे दोन्ही फॉर्म इतिहासजमा झाले असून, त्यांच्या जागी आता वयाचे कोणतेही बंधन नसलेला 'फॉर्म १२१' हा एकच सर्वसमावेशक पर्याय लागू करण्यात आला आहे.

●या बदलामुळे प्रामुख्याने निवृत्तीवेतन आणि व्याजाच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. 'फॉर्म १२१' हे एक प्रकारचे स्वयंघोषणा पत्र आहे, ज्याद्वारे करदाता बँका किंवा इतर वित्तीय संस्थांना हे अधिकृतपणे सांगू शकतो की त्याचे वार्षिक उत्पन्न करमुक्त मर्यादेपेक्षा कमी आहे. हे घोषणापत्र सादर केल्यानंतर बँका संबंधित व्यक्तीच्या व्याजातून टीडीएस कापणार नाहीत.

● ज्येष्ठ नागरिकांच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत हे मुदत ठेवी, ज्येष्ठ नागरिक बचत योजना आणि विविध व्याज देणारी गुंतवणूक साधने असतात, त्यामुळे या नवीन सुटसुटीत पद्धतीमुळे त्यांना वारंवार होणाऱ्या कपातीपासून मुक्ती मिळेल.

●या नवीन नियमांतर्गत 'पॅन' म्हणजेच कायमस्वरूपी खाते क्रमांक उद्धृत करणे अत्यंत बंधनकारक करण्यात आले आहे. जर

■ टॅक्स झोन

एखाद्या करदात्याने फॉर्म १२१ सोबत आपला पॅन क्रमांक दिला नाही, तर ती घोषणा अवैध ठरवली जाईल आणि संबंधित वित्तीय संस्था प्रचलित नियमांनुसार अधिक दराने टीडीएस कपात करू शकेल.

●याशिवाय, पारदर्शकता वाढवण्यासाठी प्रत्येक 'फॉर्म १२१' ला २६ अंकी विशिष्ट ओळख क्रमांक (यूआयएन) दिला जाणार आहे. हा क्रमांक बँका किंवा इतर संस्थांद्वारे जनरेट केला जाईल आणि तो कर विभागाकडे नोंदवणे अनिवार्य असेल. यामुळे कर चुकवेगिरीला आळा बसेल आणि कर विभागाकडे अचूक माहिती उपलब्ध राहील.

●'फॉर्म १२१' ची व्याप्ती केवळ व्याजापुरती मर्यादित नसून, यामध्ये बँक ठेवींवरील व्याज, निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधीतून (पीएफ) काढलेली रक्कम, लाभांश, म्युच्युअल फंडातून मिळणारे उत्पन्न, विमा परतावा आणि भाड्याने मिळणारे उत्पन्न अशा सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना विविध प्रकारच्या उत्पन्नासाठी वेगवेगळ्या ठिकाणी चकरा मारण्याची किंवा स्वतंत्र अर्ज करण्याची गरज उरलेली नाही.

● महत्त्वाची अट अशी की, ज्येष्ठ नागरिक हा फॉर्म केवळ तेव्हाच सादर करू शकतात जेव्हा त्यांचे एकूण कर दायित्व शून्य असते आणि त्यांचे वार्षिक उत्पन्न मूळ करमुक्त मर्यादेच्या आत असते. जर उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर त्यांना हा फॉर्म भरता येणार नाही. ज्या निवृत्त व्यक्तींकडे उत्पन्नाचे मर्यादित स्त्रोत आहेत, त्यांच्यासाठी ही व्यवस्था अत्यंत फायदेशीर ठरेल कारण त्यांना आता आयकर परतावा (रिफंड) मिळवण्यासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागणार नाही.

थोडक्यात सांगायचे तर, सरकारने कागदपत्रांचा व्याप कमी करून आणि डिजिटल ट्रॅकिंगवर भर देऊन ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक व्यवहार अधिक सुलभ आणि पारदर्शक केले आहेत. ◆◆◆

## जर्जर घर आणि भाडेकरूंचे कायदेशीर अधिकार



अलाहाबाद उच्च न्यायालयाने अलीकडेच वाराणसी येथील एका प्रकरणाचा निकाल देताना स्पष्ट केले की, मोडकळीस आलेल्या घरांच्या बाबतीत जनसुरक्षा आणि मानवी जीव वाचवणे हे भाडेकरूच्या अधिकारांपेक्षा वरचढ आहे. मात्र, याचा अर्थ भाडेकरूंना अधिकार नाहीत असा होत नाही. घर राहण्यायोग्य आणि सुरक्षित करून देणे ही घरमालकाचीच जबाबदारी असल्याचे न्यायालयाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

या संदर्भात भाडेकरूंसाठी असलेले नियम आणि कायदेशीर प्रक्रिया खालीलप्रमाणे आहेत.

**दुरुस्तीची जबाबदारी नेमकी कोणाची? :** भारतीय भाडेकरू कायद्यानुसार, घराची मूळ रचना, वीज जोडणीतील दोष आणि नळ दुरुस्ती यांसारख्या मोठ्या समस्या सोडवणे ही घरमालकाची जबाबदारी आहे. करारातील संदिग्ध अटींचा आधार घेऊन घरमालक या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. घराची छोटी-मोठी मोडतोड दुरुस्त करण्याची जबाबदारी मात्र भाडेकरूची असते.

**जेव्हा घरमालक दुरुस्ती करण्यास नकार देतो :** घरमालकाने आवश्यक दुरुस्ती करण्यास नकार दिला, तर भाडेकरू स्वतः ते काम करून घेऊ शकतो. मात्र, त्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे.

जर घराची समस्या तिथे राहण्याच्या सुविधेवर परिणाम करत असेल आणि घरमालकाने लेखी विनंतीकडे दुर्लक्ष केले असेल, तरच भाडेकरू दुरुस्तीवर झालेला खर्च भाड्यातून कापून घेऊ शकतो.

स्वतःच्या मर्जीने भाडे कमी करणे किंवा ते पूर्णपणे थांबवणे धोकादायक ठरू शकते. कायद्यानुसार याला 'भाडे न देणे' असे मानले जाऊ शकते आणि यामुळे भाडेकरूला घर रिकामे करावे लागू शकते.

सर्वात आधी घरमालकाला लेखी स्वरूपात सूचना द्या आणि दुरुस्तीसाठी ७ ते ३० दिवसांचा वेळ द्या. व्हॉट्सअॅपसारख्या अनौपचारिक संदेशांऐवजी औपचारिक नोटीस देणे कायदेशीरदृष्ट्या अधिक प्रबळ ठरते. केवळ आवश्यक कामे करा: घर राहण्यायोग्य बनवण्यासाठी जेवढी गरज आहे तेवढीच दुरुस्ती स्वतः करून घ्यावी. सजावट किंवा सौंदर्य वाढवण्यासाठी केलेल्या बदलांचे पैसे मागता येत नाहीत.

पुराव्यांचे जतन: दुरुस्तीची बिले, घराचे फोटो आणि खर्चाचा अंदाज यांची प्रत सुरक्षित ठेवा.

थोडक्यात सांगायचे तर, घर सुरक्षित ठेवणे हा भाडेकरूचा हक्क आहे, पण त्यासाठी योग्य कायदेशीर मार्गाचा आणि कागदपत्रांचा वापर करणे हिताचे आहे. ◆◆◆

## युद्धसंकटात गुंतवणुकीचे सुरक्षाकवच

इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील वाढत्या तणावामुळे जागतिक शेअर बाजारात सध्या चिंतेचे वातावरण आहे. अशा अनिश्चिततेच्या काळात गुंतवणूकदार आपला पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी धडपडत आहेत. या कठीण प्रसंगी 'फ्लेक्सी-कॅप म्युच्युअल फंड' हा एक सर्वात विश्वासार्ह आणि सुरक्षित पर्याय म्हणून समोर आला आहे. आपल्या लवचिक गुंतवणूक धोरणामुळे हे फंड बाजारातील घसरणीचा सामना करण्यास अधिक सक्षम असतात.

**फ्लेक्सी-कॅप फंड**


या प्रकारच्या फंडाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे स्वातंत्र्य. हा फंड कोणत्याही एका विशिष्ट मर्यादेत (लार्ज-कॅप, मिड-कॅप किंवा स्मॉल-कॅप) बांधलेला नसतो. जेव्हा युद्ध किंवा जागतिक संकटामुळे बाजार अस्थिर होतो, तेव्हा या

■ गुंतवणूक

फंडाच्या व्यवस्थापकाकडे पूर्ण अधिकार असतात की तो तुमचा पैसा सुरक्षित असलेल्या मोठ्या कंपन्यांमध्ये वळवू शकतो किंवा संधी मिळाल्यास मध्यम व लहान कंपन्यांमध्ये गुंतवणूक वाढवू शकतो. हेच कारण आहे की फेब्रुवारी २०२६ मध्ये गुंतवणूकदारांनी या प्रकारच्या फंडावर सर्वाधिक विश्वास दर्शवला आहे.

**घसरणीत संरक्षण कसे देतो?**

जेव्हा बाजारात मोठी उलथापालथ होते, तेव्हा प्रामुख्याने लहान आणि मध्यम आकाराच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण पाहायला मिळते. अशा वेळी फ्लेक्सी-कॅप फंडाचे व्यवस्थापक चाणाक्षपणे पोर्टफोलिओचा मोठा हिस्सा स्थिर आणि आर्थिकदृष्ट्या मजबूत असलेल्या मोठ्या कंपन्यांकडे वळवतात. यामुळे तुमच्या एकूण गुंतवणुकीत होणारी घसरण इतर फंडांच्या तुलनेत कमी राहते. २०२५ मधील चढ-उताराच्या काळातही या फंडांनी लार्ज-कॅपमध्ये अधिक गुंतवणूक ठेवून जोखीम कमी केल्याचे दिसून आले आहे.



**गुंतवणूक करण्यापूर्वी**

संबंधित व्यवस्थापकाने कोरोना किंवा मागील जागतिक मंदीच्या काळात कशी कामगिरी केली होती, हे तपासावे. फ्लेक्सी-कॅप फंडांमध्ये किमान ५ ते ७ वर्षांचा दृष्टिकोन ठेवणाऱ्या गुंतवणूकदारांनीच पैसे गुंतवावेत. फंड व्यवस्थापित करण्यासाठी आकारले जाणारे शुल्क किती आहे, याकडे लक्ष द्यावे कारण त्याचा परिणाम तुमच्या दीर्घकालीन परताव्यावर होतो. संबंधित फंड हाऊस जोखीम कशी नियंत्रित करते आणि गुंतवणुकीत किती विविधता राखते, याची खात्री करून घ्यावी.

सुरक्षिततेसोबतच फ्लेक्सी-कॅप फंडांनी परताव्याच्या बाबतीतही उत्तम कामगिरी केली आहे. गेल्या काही वर्षांतील आकडेवारी पाहिल्यास या फंडांनी इतर वैविध्यपूर्ण इक्विटी फंडांच्या तुलनेत चांगली प्रगती केली आहे:

**गेल्या ३ वर्षांचा परतावा: सरासरी १७ टक्के वार्षिक परतावा :** गेल्या ५ वर्षांचा परतावा: सरासरी १४.२ टक्के दराने गुंतवणूकदारांच्या संपत्तीत वाढ. हे आकडे स्पष्ट करतात की जर तुमच्याकडे संयम असेल आणि बाजारातील चढ-उतार झेलण्याची ताकद असेल, तर हे फंड दीर्घकाळात तुमची संपत्ती मजबूतपणे वाढवू शकतात.

**गुंतवणूकदारांचा वाढता ओघ :** फेब्रुवारी महिन्यात फ्लेक्सी-कॅप फंड्समध्ये सुमारे ६,९२५ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे, जी इक्विटी फंडांच्या सर्व श्रेणींमध्ये सर्वाधिक आहे. आजचा गुंतवणूकदार अधिक समजदार झाला असून, तो अशा फंड हाऊसला प्राधान्य देत आहे ज्यांना बाजाराच्या परिस्थितीनुसार गुंतवणुकीचे क्षेत्र बदलण्याची मुभा आहे. युद्धासारख्या आर्थिक संकटाच्या वेळी कोणत्याही एकाच क्षेत्रात अडकून राहण्यापेक्षा लवचिकता असणे अधिक फायदेशीर ठरते.

तज्ज्ञांच्या मते, प्रत्येक गुंतवणूकदाराच्या पोर्टफोलिओचा मुख्य हिस्सा फ्लेक्सी-कॅप फंड असावा. आगामी काळात ज्या कंपन्यांची कमाई चांगली असेल, त्यांचेच शेअर्स तेजीत राहतील आणि अशा कंपन्या शोधण्यात फ्लेक्सी-कॅप फंड माहिर असतात. शिस्तबद्ध पद्धतीने एसआयपीद्वारे गुंतवणूक सुरू ठेवल्यास चक्रवाढ व्याजाचा मोठा फायदा मिळतो. ◆◆◆

## पीसीओएस आणि आरोग्य विमा

पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम म्हणजेच पीसीओएस ही समस्या आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेक महिलांमध्ये दिसून येते. जेव्हा एखादी महिला आरोग्य विमा घेण्याचा विचार करते, तेव्हा तिला या आजारामुळे विमा मिळेल का किंवा त्यासाठी काही अटी असतील का, असे प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या नियमांनुसार, जर पॉलिसी घेण्यापूर्वीच तुम्हाला पीसीओएस असल्याचे निदान झाले असेल, तर विमा कंपन्या याला 'पूर्व-विद्यमान आजार' (प्री एक्झिस्टिंग डिसिजेस) म्हणून संबोधतात. याचा अर्थ असा की, विमा घेताना तुम्हाला या आजाराची माहिती अर्जात स्पष्टपणे देणे बंधनकारक आहे. जर तुम्ही ही माहिती लपवली आणि भविष्यात त्याशी संबंधित क्लेम केला, तर विमा कंपनी तो फेटाळू शकते.

**● प्रतीक्षा कालावधी आणि कव्हरेजची व्याप्ती :** विमा क्षेत्रात पूर्व-विद्यमान आजारांसाठी एक ठराविक प्रतीक्षा कालावधी असतो. पीसीओएसच्या बाबतीत हा कालावधी साधारणपणे दोन ते तीन वर्षांचा असू शकतो. या काळात पीसीओएसशी थेट संबंधित उपचारांचा खर्च विमा कंपनी उचलत नाही. मात्र, एकदा हा कालावधी संपला की, पीसीओएसमुळे उद्भवणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्या, जसे की इन्सुलिन रेझिस्टन्स, चयापचय क्रियेतील दोष किंवा मासिक पाळीतील अनियमिततेवर होणारा उपचारांचा खर्च पॉलिसीच्या अटींनुसार पूर्णपणे कव्हर केला



■ विमाजगत

जातो. महत्त्वाचे म्हणजे, हा प्रतीक्षा कालावधी केवळ पीसीओएससाठी असतो; इतर कोणत्याही नवीन आजारासाठी किंवा अपघातासाठी तुम्हाला पहिल्या दिवसापासूनच पूर्ण विमा संरक्षण मिळते.

**● ओपीडी कव्हर आणि आधुनिक सुविधांचे महत्व :** पीसीओएस हा असा आजार आहे ज्यासाठी रुग्णालयात भरती होण्यापेक्षा वारंवार डॉक्टरांचा सल्ला आणि रक्ताच्या चाचण्यांची गरज भासते. त्यामुळे, केवळ 'इन-पेशंट' (रुग्णालयात भरती झाल्यानंतरचा खर्च) कव्हर असलेली पॉलिसी घेण्याऐवजी, 'ओपीडी' कव्हर असलेली पॉलिसी निवडणे अधिक फायदेशीर ठरते. नवीन युगातील विमा योजनांमध्ये आता डॉक्टरांची फी, लॅब टेस्ट, आहारतज्ज्ञांच्या भेटी आणि टेलिकन्सल्टेशन यांसारख्या सुविधा समाविष्ट असतात. यामुळे खिशावरचा भार कमी होतो आणि नियमित तपासणी करणे सोपे जाते. काही कंपन्या वार्षिक आरोग्य तपासणीचे लाभही देतात, ज्यामुळे पीसीओएसचे व्यवस्थापन करणे सुलभ होते.

कमी वयात आरोग्य विमा घेतल्यास प्रतीक्षा कालावधी लवकर संपतो आणि भविष्यातील गुंतागुंत वाढण्यापूर्वीच तुम्हाला पूर्ण आर्थिक संरक्षण मिळते. पीसीओएस ही आरोग्य विमा नाकारण्याचे कारण नसून, ती योग्य नियोजनाची गरज अधोरेखित करणारी स्थिती आहे. महिलांनी विमा निवडताना मॅटर्निटी बेनिफिट्स आणि महिलांच्या विशिष्ट आरोग्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या 'वुमन-सेंट्रिक' योजनांचा विचार करावा. यामुळे केवळ पीसीओएससाठीच नाही, तर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर लागणाऱ्या आरोग्य गरजांसाठी एक मजबूत सुरक्षा कवच तयार होते. योग्य माहिती आणि वेळेवर घेतलेला विमा तुम्हाला कोणत्याही आर्थिक संकटाशिवाय सर्वोत्तम उपचार मिळवून देण्यास मदत करतो. ◆◆◆

# महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी सावेडी परिसरात महोत्सवाचे आयोजन

**प्रश्नमंजुषा, गायन आणि व्याख्यानातून होणार समाजजागृती; नागरिकांना सहभागाचे आवाहन**



नगर - सावेडी परिसरात महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने १४ एप्रिल रोजी हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार असून, नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा जयंती सोहळा आम्रपाली मंगल कार्यालय, गुलमोहर रोड, सावेडी येथे संध्याकाळी ४ वाजता सुरू होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात पूजन व वंदना करून होईल. त्यानंतर विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, नवोदित कलाकारांसाठी गायन सादरीकरण, तसेच समाजप्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांद्वारे महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

यावेळी पाटबंधारे मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र आंधळे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, ते समाजप्रबोधन आणि तरुणाईच्या भूमिकेबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष प्रा. निवृत्ती आरु, संपर्क प्रमुख सुधाकर जाधव, स्वागताध्यक्ष एन. एम. पवळे, तसेच सचिव सी. पी. क्षेत्रे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांनी नागरिक, विद्यार्थी आणि युवकांनी उपस्थित राहून महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करावे, असे आवाहन केले आहे.

हा जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष पी. पी. खंडागळे, शिरीष जाधव, सहसचिव बी. आर. सातपुते, गिरीष गायकवाड, भिमराव घोडके, राजेंद्र थोरात, डॉ. प्रताप घोडके, इंजि. निखिल आरु, डॉ. अमित पवळे, इंजि. किरण पगारे, अजय साळवे, ॲड. सुबोध जावधे, सतीश राजगुरु, अविनाश भोसले, मनेष कांबळे, अजित घोडेस्वार, डॉ. तुरुकमाने, डॉ. बी. एन. रणनवरे, के. के. जाधव, मार्शल भिंगारदिवे, मनोहर पाटोळे, संजय शिंदे, डॉ. शैलेश खंडागळे, रमेश जगताप, अर्जुन कांबळे, राजु थोरात, विजय पाटोळे आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# दोन वर्षांसाठी हद्दपार केलेल्या गुंडाला गावठी पिस्तूलसह पकडले

## नगर-पाथर्डी रस्त्यावर भिंगार कॅम्प पोलिसांची कारवाई



नगर - जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आलेल्या एका सराईत गुंडाला भिंगार कॅम्प पोलिसांनी बाराबाभळी शिवारात सापळा रचून अटक केली आहे. आकाश संजय पवार (वय २६, रा. ब्रम्हतळे, नागरदेवळे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून एक गावठी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

नगर-पाथर्डी रस्त्यावरील हॉटेल शौर्य समोर एक तरुण कमरेला पिस्तूल लावून संशयास्पदरीत्या फिरत असल्याची खात्रीशीर माहिती सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे तपास पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन वेढा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र सतर्क कर्मचाऱ्यांनी त्यास जागीच पकडले. झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे मिळून आले.

चौकशीत धक्कादायक बाब समोर आली की, उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी आरोपी पवार याला १६ एप्रिल २०२४ पासून दोन वर्षांसाठी संपूर्ण जिल्ह्यातून हद्दपार केले होते. असे असतानाही त्याने आदेशाचे उल्लंघन करून शहरात प्रवेश केला आणि शस्त्र बाळगले. याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कालुबर्मे, पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.जगदीश मुलगीर, पोलिस अंमलदार योगेश पवार, विलास गारुडकर, रामनाथ डोळे व प्रमोद लहारे यांच्या पथकाने केली.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिलला विद्यानगर येथे मोफत आरोग्य शिबिर

नगर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विद्यानगर येथे नागरिकांसाठी मोफत सर्वरोग निदान, आरोग्य तपासणी शिबिर व औषध वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य सेवा मिळणार आहे. हे शिबिर १४ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. स्थळ : विद्यानगर गार्डन, नगर-दौंड रोड, अहिल्यानगर.

या शिबिरात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्वरोग तपासणी, रक्तदाब व रक्तशर्करा तपासणी, डोळ्यांची तपासणी, स्त्रीरोग व दंत तपासणी आदी सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच आवश्यक रुग्णांना मोफत औषधांचे वितरणही करण्यात येणार आहे.

सदर शिबिराचे आयोजन 'दि साल्व्हेशन आर्मी इंटरनॅशनल ट्रस्ट हॉस्पिटल', संपूर्ण सुरक्षा केंद्र जिल्हा रुग्णालय, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

शिबिरात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नगरमध्ये १६ एप्रिल रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

**रुबी हॉल क्लिनिक येथील हृदयरोग तज्ज्ञांचे उपचार मार्गदर्शन**

नगर - पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १६ एप्रिल रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील सिटी केअर हॉस्पिटल मध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणाम कारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रुग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात आवर्जून तपासणी करून घ्यावी. नावनोंदणीसाठी ७३८५१९५९६२, ९२०९६३२५०२.

# खडी क्रेशरच्या २०० फूट लांबीच्या केबलची चोरी

नगर - नगर तालुक्यातील घोडकेवाडी, घोसपुरी शिवारात असलेल्या एका खडी क्रेशरची तांब्याची २०० फूट लांबीची केबल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तेजस सोमनाथ घोडके (वय २४, रा. घोडकेवाडी, घोसपुरी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे घोसपुरी शिवारातील गट नंबर ६२४ मध्ये 'भैरवनाथ स्टोन क्रेशर' नावाचे खडी क्रेशर आहे. ११ एप्रिलच्या सायंकाळी ६.३० ते १२ एप्रिलच्या सकाळी ७.४५ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी क्रेशरसाठी लागणारी तांब्याची काळे आवरण असलेली सुमारे २०० फूट लांबीची केबल कापून चोरून नेली. या चोरीला गेलेल्या केबलची किंमत साधारण ३५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

तेजस घोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार खेडकर हे करीत आहेत.

महाराष्ट्र शासन
(महसूल विभाग)

## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कर्जत

भाग कर्जत जि.अहिल्यानगर यांचे कार्यालय
ई-मेल sdmkarjat@gmail.com दूरध्वनी : ०२४८९/२२२३८७

## कलम १९ अधिसूचनेचा मसुदा

उपविभागीय अधिकारी कार्यालय कर्जत, दिनांक : २५/०३/२०२६

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३

संदर्भ- १) मा जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील आदेश क्र भूस/कार्या/१६-अ/२/२०२४ दिनांक २४/०१/२०२४.
२) क्र.भूस/एल.ए.क्यू.एस.आर./६ख/९९
मौजे बेनवडी ता कर्जत जिल्हा अहमदनगर

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अहमदनगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३(२०१३ चा ३०) यात यापुढे निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे. यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक ०४/०९/२०२५ ते १०/०९/२०२५ अन्वये कलम ११ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याद्वारे असे'अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचे, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, अहमदनगर जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे.

याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदी अन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधीनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत ता कर्जत जिल्हा अहमदनगर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव- बेनवडी तालुका कर्जत जिल्हा अहिल्यानगर**

| अ.नं. | भूमापन/सर्व्हे नंबर/हिस्सा क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १ | ४१९ | १.६१ |
| | एकूण | १.६१ |

**अनुसूची - दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव :** कुकडी डावा कालव्यावरील चिलवडी शाखा कालवा कि.मी.६ ते ९ मौजे बेनवडी, तालुका कर्जत जिल्हा अहिल्यानगरसाठी भूसंपादन

**प्रकल्प कार्याचे वर्णन :** कुकडी डावा कालव्यावरील चिलवडी शाखा कालवा कि.मी.६ ते ९ मौजे बेनवडी तालुका कर्जत जिल्हा अहिल्यानगरसाठी भूसंपादन

**समाजाला मिळणारे लाभ :-** सिंचन कालवा, सिंचन क्षमता वाढ होऊन जमीन उत्पादकता वाढ होईल पर्यायाने शेतकऱ्याची आर्थिक क्षमता सुधारणा होईल.

**अनुसूची- तीन**
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**
**गावाचे नाव- कुळधरण ता-कर्जत, जिल्हा-अहमदनगर**

| अ.नं. | भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| | निरंक | |

**अनुसूची - चार**
**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**
**लागू नाही**

टिप- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, कर्जत भाग कर्जत यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक:- २५/०३/२०२६
ठिकाण:- कर्जत, जिल्हा अहिल्यानगर
जिमाका/नगर/जाहि/०५/२०२६

(नितीन पाटील)
उपविभागीय अधिकारी
कर्जत भाग कर्जत

# जयेश खरमाळे यांचा 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये गौरव

**नॅचुरोपॅथी, बोन सेटिंग आणि आल्टरनेटिव्ह थेरपीज क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल**



नगर - ग्रामीण भागात आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुखद हेल्थ केअर सेंटरचे संचालक जयेश संपत खरमाळे यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा सन्मान प्राप्त झाला आहे. नॅचुरोपॅथी, बोन सेटिंग आणि विविध आल्टरनेटिव्ह थेरपीज क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नामांकन प्रदान करण्यात आले आहे. संपूर्णपणे नैसर्गिक उपचार पद्धतींच्या माध्यमातून अत्यंत अल्प कालावधीत म्हणजेच एक वर्षामध्ये केलेल्या कामगिरीमुळे त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या सन्मानांतर्गत त्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या मूल्यांकन मंडळाने संचालक मंडळ यांच्या शिफारशीच्या आधारे हा सन्मान जाहीर केला. ग्रामीण भागात त्यांनी केलेली समाजोपयोगी सेवा, रुग्णांप्रती असलेली बांधिलकी आणि व्यावसायिक योगदान याची विशेष दखल घेण्यात आली. ४ एप्रिल रोजी हा सन्मान अधिकृतपणे प्रदान करण्यात आला असून प्रमाणपत्र क्रमांक LBOWRE6020804 असा आहे.

प्रतिक्रिया देताना जयेश खरमाळे म्हणाले, हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. पुढील काळातही समाजसेवा आणि आरोग्य क्षेत्रात अधिक प्रभावी योगदान देण्याचा माझा प्रयत्न राहील.

# जागतिक हायरॉक्स स्पर्धेत साक्षी छाजेड यांची दमदार कामगिरी



नगर - शारीरिक ताकद, सहनशक्ती आणि मानसिक धैर्य यांची कसोटी पाहणारी जगातील सर्वात आव्हानात्मक फिटनेस स्पर्धा अशी ओळख असलेल्या जागतिक हायरॉक्स स्पर्धेत साक्षी छाजेड यांनी दमदार कामगिरी करत यश संपादित केले आहे. बंगळुरूमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत सुमारे ८ हजार खेळाडूंनी सहभाग घेतला. साक्षीने उत्तुंग कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

हायरॉक्स ही एक जागतिक स्तरावरील हायब्रिड एंड्युरन्स रेस असून यात धावणे आणि फंक्शनल फिटनेस यांचा अनोखा संगम असतो. या स्पर्धेत एकूण ८ किलोमीटर धावण्याचा समावेश असून प्रत्येक १ किलोमीटर नंतर एक वेगळे वर्कआउट स्टेशन असतो. स्पर्धेतील टप्पे अत्यंत कठीण असून त्यामध्ये १००० मीटर स्किअर्ग, स्लेड पुश, (१०२ किलो), स्लेड पुल (७८ किलो), ८० मीटर बर्पि ब्रॉड जम्पस, १००० मीटर रोविंग, २०० मीटर फार्मर्स कॅरी, १०० मीटर सॅण्ड बॅग लंजेस, (१० किलो) आणि शेवटी १०० वॉल बॉल्स (४ किलो) यांचा समावेश होता.

साक्षी या स्काय ब्रिजचे संचालक मनोज छाजेड यांची ती कन्या आहे.

# नवीन रस्त्यांवर गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदकाम

## बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये व्यक्त होतोय संताप

नगर - शहरातून जाणाऱ्या नगर मनमाड महामार्गाचे डांबरीकरण व रुंदीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला होता. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता.मात्र, नव्याने तयार झालेल्या रस्त्यावर गॅस पाईपलाईन कंपनीकडून ठिकठिकाणी खोदकाम करण्यात येत असून मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे नव्या रस्त्यांची पुन्हा दुरवस्था होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या संपूर्ण प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने अक्षरशः डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शहरात प्रशासन आहे की नाही? असा सवाली नागरिक उपस्थित करत आहेत. नव्याने झालेल्या रस्त्यांवर अशा प्रकारे खोदकाम होणे ही गंभीर बाब असून, यामुळे अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

गॅस पाईपलाईन कंपनीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरात सुरू असले रस्ता कॉंक्रिटीकरणाचे कामे भविष्यात गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदली जाऊ शकतात यासाठी महापालिकेने नव्याने तयार झालेल्या रस्त्यांचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच गॅस पाईपलाईनसारखी कामे नियोजनबद्ध पद्धतीने करून नागरिकांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. अन्यथा अशा प्रकारे नव्या रस्त्यांवर पुन्हा पुन्हा खड्डे खोदले जाणार असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.



नव्याने डांबरीकरण झालेल्या नगर मनमाड महामार्गावर गॅस पाईपलाईन कंपनीकडून केले जात असलेले खोदकाम.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरलेला आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठे करार, मदार, कोर्ट कार्यवाही, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०६/०४/२०२६**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन - मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे भिस्तबाग** येथील खालील वर्णनाची मिळकत-

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १/२ | ५३/१ | १४४१.०० चौ.मी. |

**यांसी चतु:सीमा -** पूर्वेस : सर्व्हे नंबर १/३ पैकी, दक्षिणेस : रस्ता, पश्चिमेस : सर्व्हे नंबर १/२पैकी, उत्तरेस : रस्ता,

**यावर बांधलेल्या प्रकल्पाचे नांव 'समर्पित रेसिडेन्सी' यापैकी विंग बी यापैकी**

**स्टील्ट ग्राऊंड फ्लोअर मधील निवासी सदनिका नंबर १०४ याचे कारपेट क्षेत्र ५६.६४ चौ. मीटर, अनकाऊंटेड कॉमन प्रोजेक्शन क्षेत्र ७.९८ चौमी. एकूण कारपेट क्षेत्र ६४.४३ चौ. मी. बिल्टअप क्षेत्र ८०.८५ चौ. मी. ही संपुर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सीमा -** पुर्वेस : ओपन टू स्काय, दक्षिणेस : फ्लॅट नंबर १०५, पश्चिमेस : लिफट व ओपन टू स्काय, उत्तरेस : ओपन टु स्काय,

**विद्यमान मालक : १.सौ.वंदना जयकुमार खुबचंदानी, २. सौ. मनिषा हरिष खूबचंदानी, ३. श्री. रमेश आयलदास खूबचंदानी,** नंबर १ ते ३ मालक व विकसक साई शेल्टर या भागीदारी फर्मचे भागीदार म्हणुन, ४. **विकसक साई शेल्टर** या भागीदारी फर्मचे भागीदार- **श्री. सतिष बाळकृष्ण पागा,** सर्व रा सावेडी अहिल्यानगर.

**ॲड.वैभव मोहनराव पवार (ॲडव्होकेट व नोटरी पब्लीक)**
**ॲड.रेणुका करांडे-पवार**
पहिला मजला, क्लासिक झेरॉक्स, जुने कलेक्टर कचेरी रोड, अ.नगर. मो.नं. ९०११३६४८०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांचे एकत्र हिंदु एकत्र कुटुंबाचे मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत दिलीप बबन पवार यांचे नावे महसूल दप्तरी नोंदलेली असून दिलीप बबन पवार यांची फसवणूक करुन प्रकाश धनाजी सपकाळ यांनी पोकळीस्त खरेदीखताचा दस्त करुन घेतल्याचे आमचे अशिलांचे नुकतेच निदर्शनास आलेले असल्यामुळे आमचे अशिल सदर मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करीत आहे. अशी परिस्थिती असतांना प्रकाश धनाजी सपकाळ हे पोकळीस्त खरेदीखताचे आधारे परिशिष्टात नमूद केलेली मिळकत हस्तांतर करण्याचे विचारात असून तिऱ्हाईत इसमांचे हक्क हितसबंध निर्माण करण्याचे प्रयत्नात आहेत तशा त्यांच्या जोरदार हालचाली चालू आहेत.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत प्रकाश धनाजी सपकाळ, रा. सारसनगर, अहिल्यानगर यांचे बरोबर अगर त्यांचे वतीने अन्य तिऱ्हाईत इसमाबरोबर परिशिष्टात नमूद मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा/हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. अगर कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करु नये. केल्यास त्यांना मिळकतीची मालकी व ताबा मिळणार नाही. सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्दीस दिली असे. कळावे

**'परिशिष्ट' मिळकतीचे वर्णन :-** तुकडी अहिल्यानगर, पोट तुकडी तालुका अहिल्यानगर, अहिल्यानगर महानगर पालिका हद्दीतील मौजे **नालेगांव** येथील गट नंबर ७९/१, याचे क्षेत्र ०हे.०९ आर या पैकी ०हे.०६ आर क्षेत्राची मिळकत या मध्ये १८०० चौरस फुटाचे हॉटेल साई संचिती या नावाने इमारतीचे बांधकाम हॉटेल व्यवसायासाठी लागणारे सर्व सुविधा व वस्तूंसह मिळकत यांसी चतु:सिमा - पुर्वेस- सर्व्हे नंबर ७९/२, दक्षिणेस-लागू जुना मार्ग, पश्चिमेस - रिंग रोड, उत्तरेस-नगर-कल्याण रोड यातील वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कांसह तदंगभुत वस्तुंसह खाली काहीएक राखून न ठेविता.

अहिल्यानगर, ता. १३/०४/२०२६

**ॲड. अनिल दिनकरराव सरोदे**
रा. ऑफिस नंबर ३१२, कोर्ट यार्ड, ई- बिल्डींग, तारकपुर बस स्टॅण्ड समोर, तारकपूर, आहिल्यानगर, मो.नं. ९८२२३९८२०९

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **आशा देवीदास अंबुलकर रा. ओटी मेहेर, वार्ड नं.७, इस्नेहल नगर वर्धा** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर जमीन विक्री करण्यास इच्छूक असून, आमचे अशिल सदरची मिळकत कायमखूष खरेदी घेण्यास इच्छूक आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :**

डि. ।। अहिल्यानगर/अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे अरणगांव** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट नं. | हे.आर. | रु. पै. |
|---|---|---|
| ५५०/१ | ०-०३ | ०-११ |
| | पो.ख. ०-०२ | |
| | ०-०५ | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची संपूर्ण उत्तरेकडील पश्चिम कोपऱ्यातील ० हे. ०३ आर व पो. ख. ० हे. ०१ आर मिळकतीबाबत. **यांसी चतु:सिमा -**
पुर्वेस :- गट नं. ५५० पैकी, दक्षिणेस :- गट नं. ५५० पैकी
पश्चिमेस :- गट नं. ५४९, उत्तरेस :- रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखून न ठेविता.
दि.१३/०४/२०२६
अहमदनगर

**ॲडव्होकेट**
**नाजीम अहमद इस्माईल शेख**
**कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली, अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

